.. amRitAnubhava by Sant Dnyaneshwar ..

# ॥ अमृतानुभव ॥

प्रकरण पहिले

शिवशक्तिसमावेशन

यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम् ।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १॥
गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शांकरी ।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ॥ २॥
सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ।
ज्ञातुं न शक्यते लग्नमितिद्वैतच्छलान्मुहुः ॥ ३॥
अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् ।
तौ वंदे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४॥
मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥ ५॥
ऐशी ही निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।
तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ॥ १-१॥
जो प्रीयुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरीं ।
चारुस्थळीं एकाहारी । एकाआंगाची ॥ १-२॥
आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती आंगें ।
कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहाति ॥ १-३॥
जि एकचि नव्हे एकसरें । दोघा दोपण नाहीं पुरें ।
काय नेणों साकारें । स्वरूपें जियें ॥ १-४॥
कैशी स्वसुखाची अळुकी । जे दोनीपण मिळोनि एकीं ।
नेदितीच कवतुकीं । एकपण फुटों ॥ १-५॥
हा ठावोवरी वियोगभेडे । जें बाळ जगायेवढें ।
वियालीं परी न मोडे । दोघुलेपण ॥ १-६॥
आपुलिये आंगीं संसारा । देखलिया चराचरा ।
परी नेदितीच तिसरा । झोक लागों ॥ १-७॥
जया एके सत्तेचें बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें ।
जें अनादि एकपणें । नांदती दोघें ॥ १-८॥
भेदु लाजौनि आवडी । एकरसीं देत बुडी ।
जो भोगणया थाव काढी । द्वैताचा जेथें ॥ १- ९॥
जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहींना तो गोसावी ।
किंबहुना एकोपजीवी । एकएकांची ॥ १-१०॥

कैसा मेळु आला गोडिये । दोघे न माती जगीं इये ।
कीं परमाणूहि माजी उवाये । मांडिलीं आहाती ॥ १-११ ॥
जिहीं एकएकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण ।
जिये दोघे जीवप्राण । जिया दोघा ॥ १-१२ ॥
घरवातें मोटकी दोघे । जैं गोसावी सेजे रिघे ।
तैं दंपत्यपणें जागे । स्वामिणी जे ॥ १-१३ ॥
जया दोघांमाजीं एकादें । विपायें उमजलें होय निदे ।
तरी घरवात गिळुनी नुसधें । कांहीं ना कीं ॥ १-१४ ॥
दोन्ही आंगांची आटणी । गिंवसीत आहाती एकपणीं ।
जाली भेदाचिया वाहाणी । आधाधी जियें ॥ १-१५ ॥
विषो एकमेकांची जिये । जिये एकमेकांची विषयी इयें ।
जिहीं दोघीं सुखियें । जिये दोघे ॥ १-१६ ॥
स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण एकलें नांदे ।
जग सकळ अधाधेरु । पणें जिहीं ॥ १-१७ ॥
दो दांडीं एक श्रुती । दोहों फुलीं एक दृति ।
दोहों दिवीं दीप्ती । एकीची जेवीं ॥ १-१८ ॥
दो ओठीं एकी गोष्टी । दो डोळां येकी दृष्टी ।
तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । एकीचि जेवीं ॥ १-१९ ॥
दाऊनि दोनीपण । एकरसाचें आरोगण ।
करीत आहे मेहूण । अनादि जे ॥ १-२० ॥
जे स्वामीचिया सत्ता । वीण असो नेणें पतिव्रता ।
जियेवीण सर्वकर्ता । कांही ना जो ॥ १-२१ ॥
जे कीं भाताराचें दिसणें । भातारुचि जियेचें असणें ।
नेणिजती दोघेंजणें । निवडूं जिये ॥ १-२२ ॥
गोडी आणि गुळु । कापुर आणि परिमळु ।
निवडूं जातां पांगुळु । निवाडु होये ॥ १-२३ ॥
समग्र दीप्ती घेतां । जेवि दीपचि ये हाता ।
तेवी जियेचिया तत्त्वता । शिवूचि लाभे ॥ १-२४ ॥
जैशी सूर्यीं मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ।
तैशी भेद गिळित शोभा । एकचि जे ॥ १-२५ ॥
कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक ।
तैसें द्वैतमिसें एक । बरवतसे ॥ १-२६ ॥
सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु ।
जेणें दादुलेन सत्त विशेषु । शक्ती जाली ॥ १-२७ ॥
जिये प्राणेश्वरीवीण । शिवींहि शिवपण ।
थारो न शके ते आपण । शिवे घडली ॥ १-२८ ॥

ऐश्वर्येंशी ईश्वर । जियेचें अंग संसारा ।
आपण होऊनी उभारा । आपणचि जे ॥ १-२९ ॥
पतीचेनि अरूपपणें । लाजोनि अंगाचें मिरवणें ।
केलें जगायेवढें लेणें । नामरूपाचें ॥ १-३० ॥
ऐक्याचाही दुकाळा । बहुपणाचा सोहळा ।
जिये सदैवोचिया लिळा । दाखविला ॥ १-३१ ॥
आंगाचिया आटणिया । कांतु उवाया आणिला जिया ।
स्वसंकोचें प्रिया । रूढविली जेणें ॥ १-३२ ॥
जियेतें पाहावयाचिया लोभा । चढे दृष्टत्वाचिया क्षोभा ।
जियेतें न देखतुचि उभा ॥ आंगचि सांडी ॥ १-३३ ॥
कांतेचिया भिडा । अवला होय जगायेवढा ।
अंगविला उघडा । जियेवीण ॥ १-३४ ॥
जो हा ठाव मंदरूपें । उवाइलेपणें हारपे ।
तो जाला जियेचेनि पडपें । विश्वरूप ॥ १-३५ ॥
जिया चेवविला शीवु । वेद्याचे बोणें बहु ।
वाढीतेणेंसि जेउ । धाला जो ॥ १-३६ ॥
निदेलेनि भातारें । जे विये चराचरें ।
जियेचा विसावला नुरे । आंबुलेपणही ॥ १-३७ ॥
जंव कांत लपो बैसें । तंव नेणिजे जियोद्देशें ।
जिये दोघे आरिसे । जिया दोघा ॥ १-३८ ॥
जियेचेनि अंगलगें । आनंद आपणा आरोगूं लागे ।
सर्व भोक्तृत्वही नेघे । जियेविण कांहीं ॥ १-३९ ॥
जया प्रियेचें जें आंग । जो प्रियु जियेचें चांग ।
कालवूनि दोन्ही भाग । जेविते आहाति ॥ १-४० ॥
जैशि कां समीरेसकट गति । कां सोनियासकट कांती ।
तैसे शिवेशी शक्ति । अवघीच जे ॥ १-४१ ॥
कां कस्तुरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु ।
तैसा शक्तीशी केवळु । श्रीशिवूचि जो ॥ १-४२ ॥
राति आणि दिवो । पातली सूर्याचा ठावो ।
तैसा आपुलिया साचीं वावो । दोघे जिये ॥ १-४३ ॥
किंबहुना तिये । प्रणवाक्षरीं विरुढतिये ।
दशेचीही वैरिये । शिवशक्ति ॥ १-४४ ॥
हें असो नामरूपाचा भेदसिरा । गिळित एकार्थाचा उजिरा ।
नमो तया शिववोहरा । ज्ञानदेवो म्हणे ॥ १-४५ ॥
जयाच्या दोघांच्या आलिंगनीं । विरोनि गेली दोन्ही ।
आघवियाचि रजनी । दिठिचि जे ॥ १-४६ ॥

जयांच्या रूपनिर्धारीं । गेली परेसीं वैखरी ।
सिंधूशीं प्रलयनिरीं । गंगा जैशी ॥ १-४६ ॥
जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनी गेलीं दोनी ।
अघवीयाचिं रजनी । दिठीच जे ॥ ४७ ॥
वायु चळबळेंशीं । जिराला व्योमाचिये कुशीं ।
अटला प्रळयप्रकाशीं । सप्रभ भानु ॥ १-४८ ॥
तेवीं निहाळितां ययातें । गेले पाहणेंनशी पाहते ।
पुढती घरौतें वरौतें । वंदिलीं तियें ॥ १-४९ ॥
जयाच्या वाहणीं । वेदकु वेद्याचें पाणी ।
न पिये पण सांडणी । आंगाचीही करी ॥ १-५० ॥
तेथ मी नमस्करास । लागीं उरों दुसरा ।
तरी लिंगभेद पक्ष्हा । जोडूं जावों ॥ १-५१ ॥
परि सोनेनसी दुजें । नव्हतु लेणें सोना भजे ।
हें नमन करणें माझें । तैसें आहे ॥ १-५२ ॥
सांगतां वाचेतें वाचा । ठावो वाच्यवाचकाचा ।
पडतां काय भेदाचा । विटाळु होये ॥ १-५३ ॥
सिंधु आणि गंगेची मिळणी । स्त्रीपुरुष नामाची मिरवणी ।
दिसतसे तरी काय पाणी । द्वैत होईल ? ॥ १-५४ ॥
पाहें पा भास्य भासकता । आपुलां ठाई दाविता ।
एकपण काय सविता । मोडीतसे ? ॥ १-५५ ॥
चांदाचिया दोंदावरी । होता चांदणियाची विखुरी ।
काय उणें दीप्तीवरी । गिंवसो पा दीपु ॥ १-५६ ॥
मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगुळ ।
अगळें निर्मळ । रूपा ये कीं ? ॥ १-५७ ॥
मात्राचिया त्रिपुटिया । प्रणवू काय केला चिरटिया ? ।
कीं 'णकार' ती रेघटिया । भेदवला काई ? ॥ १-५८ ॥
अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभ मिळे ।
तरि स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु का पाणी ॥ १-५९ ॥
म्हणोनि भूतेशु अणि भवानी । वंदिली न करोनि सिनानीं ।
मी निघालों नमनीं । तें हें ऐसें ॥ १-६० ॥
दर्पणाचेनि त्यागें । प्रतिबिंब बिंबीं रिगे ।
कां बुडी दीजे तरंगें । वायूचा ठेला ॥ १-६१ ॥
नातरी नीदजात खेवो । पावे आपुला ठावो ।
तैशी बुद्धित्यागें देवी देवो । वंदिली मिया ॥ १-६२ ॥
सांडूनि मीठपणाचा लोभु । मीठें सिंधुत्वाचा घेतला लाभु ।
तेवी अहं देऊनि मी शंभु । शांभवी झालों ॥ १-६३ ॥

शिवशक्ति समावेशें ।नमन केलें म्यां ऐसें ।
रंभागर्भ आकाशे ।रिघाला जैसा ।१-६४॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे शिवशक्तिसमावेशनमन नाम प्रथमं प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण दुसरें
## श्रीगुरुस्तवन

आतां उपायवनवसंतु ।जो आज्ञेचा आहेवतंतु ।
अमूर्तचि परि मूर्तु ।कारुण्याचा ॥ २-१॥
मोडोनि मायाकुंजरु ।मुक्तमोतियाचा वोगरू ।
जेवविता सद्गुरु ।निवृत्ति वंदू ॥ २-३॥
अविद्येचे आडवे ।भुंजीत जीवपणाचे भवे ।
तया चैतन्याचे धांवे ।कारुण्यें जो कीं ॥ २-३॥
जयाचेनि आपांगपातें ।बद्ध मोक्षपणीं आते ।
भेटे जाणतया जाणतें ।जयापाशीं ॥ २-४॥
कैवल्यकनकाचिया दाना ।जो न कडसी थोर साना ।
द्रष्ट्याचिया दर्शना ।पाढाऊ जो ॥ २-५॥
सामर्थ्याचेनि बिकें ।जो शिवाचेंही गुरुत्व जिंके ।
आत्मा आत्मसुख देखे ।आरसां जिये ॥ २-६॥
बोधचंद्राचिया कळा ।विखुरल्या एकवळा ।
कृपापुनीव लीळा ।करी जयाची ॥ २-७॥
जो भेटलियाचि सवे ।पुरति उपायाचे धांवे ।
प्रवृत्तिस्गंगा स्थिरावे ।सागरीं  जिये ॥ २-८॥
जयाचेनि अनवसरें ।द्रष्टा ले दृश्याचें मोहिरें ।
जो भेटतखेव सरे ।बहुरुपचि हें ॥ २-९॥
अविद्येचें काळवखें ।कीं स्वबोधसुदिनीं फांके ।
सीतलें प्रसादार्कें ।जयाचेनि ॥ २-१०॥
जयाचेनि कृपासलिलें ।जीवू हा ठाववरी पाखाळे ।
जे शिवपणही वोविळें ।अंगीं न लवी ॥ २-११॥
राखों जातां शिष्यातें ।गुरुपणही धाडिलें थितें ।
तरी गुरूगौरव जयातें ।सांडीचिना ॥ २-१२॥
एकपण नव्हे सुसास ।म्हणूनि गुरुस्शिष्याचे करुनि मिस ।
पाहणेचि आपली वास ।पाहतचि असे ॥ २-१३॥
जयाचेनि कृपातुषारें ।परतलें अविद्येचें मोहिरें ।
परिणमे अपारें ।बोधामृतें ॥ २-१४॥
वेद्या देतां मिठी ।वेदकूही सुये पोटीं ।
तर्क्ष्हीं नव्हेचि उशिटी ।दिठी जयाची ॥ २-१५॥

जयाचेनि सावायें । जीवू ब्रह्मउपर लाहे ।
ब्रह्म तृणातळीं जाये । उदासें जेणें ॥ २-१६ ॥
उपास्तीवरी राबतिया । उपायफळीं येती मोडूनिया ।
वरिवंडले जयाचिया । अनुज्ञा का ॥ २-१७ ॥
जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमवनाआंतु ।
तंव आपुलिये फळीं हातु । न घेपती ही ॥ २-१८ ॥
पुढें दृष्टीचेनि आलगें । खोची की निवटे मागें ।
येवढेया जैता नेघे । आपणपें जो ॥ २-१९ ॥
लघुत्वाचेनि मुद्दलें । बैसला गुरुत्वाचे शेले ।
नासूनि नाथिलें । सदैव जो ॥ २-२० ॥
नाहीं तें जळीं बुडिले । तै घनवटें जेणें तरिजे ।
जेणें तारिलियाहि नुरिजे । कवणी ठायीं ॥ २-२१ ॥
आकाश हे सावेव । न बंधे आकाशाची हांव ।
ऐसें कोणी एक भरीव । आकाश जो ॥ २-२२ ॥
चंद्रादि सुशीतळें । घडली जयाचेनि मेळें ।
सूर्य जयाचेनि उजाळे । कडवसेनी ॥ २-२३ ॥
जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलीये दशे ।
शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें ॥ २-२४ ॥
चांदिणें स्वप्रकाशाचें । लेइला द्वैतदुणीचें ।
तर्ह्ही उघडेपण नवचे । चांदाचें जया ॥ २-२५ ॥
जो उघड कीं न दिसे । प्रकाश की न प्रकाशे ।
असतेपणेंचि नसे । कव्हणीकडे ॥ २-२६ ॥
आतां जो तो इहीं शब्दीं । कें मेळवूं अनुमानाची मांदी ।
हा प्रमाणाही वो नेदी । कोणाही मा ॥ २-२७ ॥
जेथें शब्दाची लिही पुसे । तेणेंशीं चावळों बैसे ।
दुजयाच्या रागीं रुसे । एकपणा जो ॥ २-२८ ॥
प्रमाणाची परी सरे । तैं प्रमेयेची आविष्करे ।
नवल मेचु ये धुरे । नाहींपणाची ॥ २-२९ ॥
कांहीबाही अळुमाळु । देखिजे येखादे वेळू ।
तरी देखे तेंही विटाळू । जयां गांवीं ॥ २-३० ॥
तेथें नमनें का बोलें। केउतीं सुयें पाउलें ।
आंगीं लावुनि नाडिलें । नांवचि येणें ॥ २-३१ ॥
नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढवितां के निवृत्ती ? ।
या नामाचि वाय बुंथी । सांडीचिना ॥ २-३२ ॥
निवर्त्य तंव नाहीं । मा निवर्तवी हा काई ? ।
तरि कैशी बैसे ठाई । निवृत्तिनामाच्या ? ॥ २-३३ ॥

परी सूर्यासी अंधकारु । कै जाहला होता गोचरू ? ।
तरी तमारी हा डगरू । आलाचि कीं ॥ २-३४ ॥
तैसें लटिकें येणें रूढे । जड येणें उजिवडे ।
न घडे तेंहि घडे । याचिया मावा ॥ २-३५ ॥
हां गा मायावशें दाविशी । तें मायिक म्हणूनी वाळिशी ।
अमायिक तंव नव्हशी । कवणाहि विषयो ॥ २-३६ ॥
शिव शिवा सद्गुरु । तुजला गूढा काय करूं ? ।
एकाही निर्धार करूं । देतासी कां ? ॥ २-३७ ॥
नामें रूपें बहुवसें । उभारुनि पाडिलीं वोसें ।
सत्तेचेनि आवेशे । तोषलासी ना ? ॥ २-३८ ॥
जिवु घेतलिया उणे । चालों नेदिसी साजणें ।
मृत्यु उरे स्वामीपणें । तेंही नव्हे ॥ २-३९ ॥
विशेषाचेनि नांवें । आत्मत्वही न साहवे ।
किंबहुना नव्हे । कोण्ही या ॥ २-४० ॥
राती नुरेचि सूर्या । नातरी लवण पाणिया ।
नुरेचि जेवि चेइलिया । नीद जैशी ॥ २-४१ ॥
कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव ।
नुरेचि रूप नांव । तैसें यया ॥ २-४२ ॥
याच्या हाता पाया पडे । तंव वंद्यत्वें पुढें न मंडे ।
न पडेचि हा भिडे । भेदाचिये ॥ २-४३ ॥
आपणाप्रति रवि । उदो न करी जेवीं ।
हा वंद्य नव्हें तेवी । वंदनासी ॥ २-४४ ॥
कां समोरपण आपुलें । न लाहिजे कांहीं केलें ।
तैसें वंद्यत्व घातलें । हिरोनी येणें ॥ २-४५ ॥
आकाशाचा अरिसा । नुठी प्रतिबिंबाचा ठसा ।
हा वंद्य नव्हे तैसा । नमस्कारासि ॥ २-४६ ॥
परी नव्हे तरी न हो । हे वेखासि कां घेवों ।
परी वंदीतयाही ठावो । उरों नेदी ॥ २-४७ ॥
आंगौनि एकुणा झोलु । फेडितांचि तरी तो बाहिरीलु ।
कडु फिटे आतुलु । न फेडीतांचि ॥ २-४८ ॥
नाना बिंबपणासरिसे । घेउनि प्रतिबिंब नासे ।
नेलें वंद्यत्व येणें तैसें । वंदतेनसी ॥ २-४९ ॥
नाहीं रूपाची जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींच नव्हे ।
आम्हा फळले हे पाये । ऐशिया दशा ॥ २-५० ॥
गुणा तेलाचिया सोयरिका । निर्वाहिली दीपकळिका ।
ते कां होईल पुळिका । कापुराचिया ॥ २-५१ ॥

तया दोहो परस्परें । होय ना जंव मैल्हेरे ।
तंव दोहीचेंही सरे । सरिसेंचि ॥ २-५२॥
तेवि देखेना मी ययातें । तंव गेलें वंद्य वंदितें ।
चेइलिया कांते । स्वप्नींचि जेवी ॥ २-५३॥
किंबहुना इया भाषा । द्वैताचा जेथें उपखा ।
फेडुनियां स्वसखा । श्रीगुरू वंदिला ॥ २-५४॥
याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपणा रूप नाहीं ।
आणि गुरुर्स्शिष्य दुवाळीही । पवाडु केला ॥ २-५५॥
कैसा आपणया आपण । दोंवीण सोयरेपण ।
हा याहूनि विलक्षण । नाहीं ना नोहे ॥ २-५६॥
जग अवघें पोटीं माये । गगनायेवढें होऊनि ठाये ।
कीं तेंचि निसी साहे । नाहींपणाची ॥ २-५७॥
कां पूर्णते तरि आधारू । सिंधु जैसा दुर्भरू ।
तैसा विरुद्धा पाहुणेरू । याच्या घरीं ॥ २-५८॥
तेजा तमातें कांहीं । परस्परें निकें नाहीं ।
परी सूर्याच्या ठायीं । सूर्यचि असे ॥ २-५९॥
एक म्हणतां भेदे । ते कीं नानात्वें नांदे ? ।
विरुद्धे आपणया विरुद्धे । होती काई ? ॥ २-६०॥
म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहों शब्दांचा अर्थु ।
श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायीं ॥ २-६१॥
कां सुवर्ण आणि लेणें । वसतें एकें सुवर्णें ।
वसते चंद्र चांदणें । चंद्रींचि जेवीं ॥ २-६२॥
नाना कापुर आणि परिमळु । कापूरचि केवळु ।
गोडी आणि गुळु । गूळचि जेवीं ॥ २-६३॥
तैसा गुरुशिष्यमिसें । हाचि एकु उल्हासे ।
जरी कांहीं दिसे । दोन्हीस्पणें ॥ २-६४॥
आरिसा आणि मुखीं । मी दिसे हे उखी ।
हे आपुलिये ओळखी । जाणे मुख ॥ २-६५॥
पहा पा निरंजनीं निदेला । तो हा निर्विवाद एकला ।
परी चेता चेववि‍ता जाला । दोनी तोचि ॥ २-६६॥
ते तोचि चेता तोचि चेतवी । तेवी हाचि बुझे हाचि बुझावी ।
गुरुर्स्शिष्यत्व नांदवी । ऐसेन हा ॥ २-६७॥
दर्पणेंवीण डोळा । आपुले भेटीचा सोहळा ।
भोगितो तरी लीळा । सांगतों हें ॥ २-६८॥
एवं द्वैतासी उमसो । नेदि ऐक्याशी विसकुसो ।
सोइरिकीचा अतिसो । पोखीतसे ॥ २-६९॥

निवृत्ति जया नांव । निवृत्ति जया बरव ।
जया निवृत्तीचि राणीव । निवृत्तिची ॥ २-७०॥
वांचोनि प्रवृत्तिविरोधें । कां निवृत्तीचेंनि बोधें ।
आणिजे तैसा वादें । निवृत्ति नव्हे ॥ २-७१॥
आपणा देऊनि राती । दिवसा आणी उन्नति ।
प्रवृत्ति वारी निवृत्ति । नव्हे तैसा ॥ २-७२॥
वोपसरयाचें बळ । घेउनि मिरवे कीळ ।
तैसें रत्न नव्हे निखळ । चक्रवर्ती हा ॥ २-७३॥
गगनही सूनि पोटीं । जैं चंद्राची पघळे पुष्टी ।
तैं चांदिणें तेणेंसि उठी । आंग जयाचें ॥ २-७४॥
तैसें निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण ।
घेयावया फूलचि झालें घ्राण । आपुली दृती ॥ २-७५॥
दिठी मुखाचिये बरवे । पाठीकडूनि जैं पावे ।
तैं आरिसे धांडोळावे । लागती काई ? ॥ २-७६॥
कीं राती हन गेलिया । दिवस हन पातलिया ।
काय सूर्यपण सूर्या । होआवें लागें ? ॥ २-७७॥
म्हणोनि बोध्य बोधोनि । घेपे प्रमाणें साधूनि ।
ऐसा नव्हे भरंवसेंनि । गोसावी हा ॥ २-७८॥
ऐसें करणयावीण । स्वयंभचि जें निवृत्तिपण ।
तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥ २-७९॥
आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरुप्रणामें येणें ।
फेडिली वाचाऋणें । चौही वाचांचीं ॥ २-८०॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे सद्गुरुस्तवननाम द्वितीय प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण तिसरें

## वाचाऋणोत्तीर्ण

ययाचेनि बोभाटे । आत्मयाची झोप लोटे ।
पूर्ण तर्‍हीं ऋण न फिटे । जे चेणेंचि नीद कीं ॥ ३-१॥
येर्‍हवीं परादिका चौघी । जीव मोक्षाच्या उपेगी ।
अविद्येसवें आंगीं । वेंचती कीर ॥ ३-२॥
देहासवे हातपाये । जाती मनासवें इंद्रियें ।
कां सूर्यासवें जाये । किरणजाळ ॥ ३-३॥
ना तरी निद्रेचिये अवधी । स्वप्नें मरती आधीं ।
तेवीं अविद्येचे संबंधी । अटती इया ॥ ३-४॥
मृतें लोहें होती । ते रसरूपें जिती ।
जळोनि इंधनें येती । वन्हीदशे ॥ ३-५॥

लवण आंगें विरे । परी स्वादें जळीं उरे ।
नीद मरोनि जागरें । जीइये निदे ॥ ३-६ ॥
तेवि अविद्येसवें । चौघीं वेचितीं जीवें ।
तत्त्वज्ञानाचेनि नांवे । उठतीचि इया ॥ ३-७ ॥
हा तत्त्वज्ञान दिवा । मरोनि इहीं लावावा ।
तरी हाही शीण लेवा । बोधरूपेंची ॥ ३-८ ॥
येऊनि स्वप्न मेळवी । गेलिया आपणपां दावी ।
दोन्ही दिठी नांदवी । नीद जैशी ॥ ३-९ ॥
जिती अविद्या ऐशी । अन्यथा बोधातें गिंवशी ।
तेचि यथाबोधेंसी । निमाली उठी ॥ ३-१० ॥
परी जीती ना मेली । अविद्या हे जाकळी ।
बंधमोक्षीं घाली । बांधोनियां ॥ ३-११ ॥
मोक्षुचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे ? ।
अज्ञाना घरी त्राये । वाउगी यांची ॥ ३-१२ ॥
बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बाळपणें ।
येरा तो नाहीं मा कोणें । मृत्यु मानावा ? ॥ ३-१३ ॥
घटाचें नाहींपण । फुटलियाची नागवण ।
मानितसे तें जाण । म्हणो ये कीं ॥ ३-१४ ॥
म्हणोनि बंधुचि तंव वावो । मा मोक्षा कें प्रसवो ? ।
परी मरोनि केला ठावो । अविद्या तया ॥ ३-१५ ॥
आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें ।
म्हणितलें असे । सदाशिवें ॥ ३-१६ ॥
आणि वैकुंठींचेनिहि सुजाणें । ज्ञानपाशीं सत्त्वगुणें ।
बांधिजे हें निरोपण । बहु केलें ॥ ३-१७ ॥
परी शिवें कां श्रीवल्लभें । बोलिलें येणेंचि लोभें ।
मानूं तें हें लाभे । न बोलतांही ॥ ३-१८ ॥
जें आत्मज्ञान निखळ । तेंही घे ज्ञानाचें बळ ।
तैं सूर्य चिंती सबळ । तैसे नोहे ? ॥ ३-१९ ॥
ज्ञानें श्लाघतु आहे । तैं ज्ञानपण धाडिलें वाये ।
दीप वांचोनि दिवा लाहे । तैं आंग भुललाचि कीं ॥ ३-२० ॥
आपणपें आपणापाशीं । नेणतां देशोदेशीं ।
आपणपें गिंवशी । हें कीरू होये ? ॥ ३-२१ ॥
परि बहुतां कां दिया । आपणपें आठवलिया ।
म्हणे मी यया । कैसा रिझों ? ॥ ३-२२ ॥
तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपली प्रमा ।
करितसे सोहमा । ऐसा बंधु ॥ ३-२३ ॥

जें ज्ञान स्वये बुडे । म्हणोनी भारी नावडे ।
ज्ञानें मोक्षु घडे । तें निमालेनि ॥ ३-२४॥
म्हणोनि परादिका वाचा । तो शृंगारु चौ आंगाचा ।
एवं अविद्या जीवाचा । जीवत्व त्यागी ॥ ३-२५॥
आंगाचेनि इंधने उदासु । उठोनि ज्ञानाग्नी प्रवेशु ।
करी तेथें भस्मलेशु । बोधाचा उरे ॥ ३-२६॥
आंगीं लाविलिया विभूति । तैं परमाणूही झडती ।
परि पांडुरत्वें कांती । राहे जैशी ॥ ३-२७॥
जळीं जळा वेगळु । कापूर न दिसे अवडळु ।
परी होऊनि परिमळु । उरे जेवीं ॥ ३-२८॥
ना वोहळला आंगीं जैसे । पाणी पाणीपणें नसे ।
तर्क्षीं वोल्हासाचेनि मिसें । आथीच तें ॥ ३-२९॥
ना तरी माध्यान्हकाळीं । छाया न दिसे वेगळी ।
असे पायातळीं । रिगौनियां ॥ ३-३०॥
तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें ।
आपुलेपणें उरे । बोधु जो कां ॥ ३-३१॥
तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां ।
तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ ३-३२॥
म्हणोनि परा पश्यंती । मध्यमा हन भारती ।
या निस्तरलिया लागती । ज्ञानीं अज्ञानींची ॥ ३-३३॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे वाचाऋणोत्तीर्णनाम तृतीय प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण चवथें
## ज्ञान अभेदकथन

आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरें ।
नीद साधोनि जागरें । नांदिजे जेवी ॥ ४-१॥
कां दर्पणाचा निघाला । ऐक्यबोधु पहिला ।
मुख भोगी आपुला । आपणचि ॥ ४-२॥
ज्ञान जिया तिया परी । जगीं आत्मैक्य करी ।
तैं सुरिया खोचे सुरी । तैसें जाहलें ॥ ४-३॥
लावी आंत ठाउनि कोपट । तो साधी आपणया सकट ।
का बांधलेया चोरट । मोटेमाजी ॥ ४-४॥
आगी पोतासाचेनि मिसें । आपणपें जाळिलें जैसें ।
ज्ञाना अज्ञाननाशें । तैसें जाहलें ॥ ४-५॥
अज्ञानाचा टेका । नसतांही ज्ञान अधिका ।
फांके तंव उफखा । आपुला पडे ॥ ४-६॥

वात दशाही ते निमालियां । येणें जें ये उवाया ।
तें केवळ नाशावया । दीपाचे परी ॥ ४-७॥
उठणें कीं पडणें । कुचभाराचे कोण जाणें ।
कां फांकणें कीं सुकणें । जाउळाचें ॥ ४-८॥
तरंगाचें रूपा येणें । तयाचि नांव निमणें ।
कां विजूचें उदैजणें । तोचि अस्तु ॥ ४-९॥
तैसें पिऊनि अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान ।
जंव आपुलें निधन । निःशेष साधे ॥ ४-१०॥
जैसें कल्पांतीचें भरितें । स्थळां जळां दोहींतें ।
बुडविलिया आरौतें । राहोंचि नेणें ॥ ४-११॥
कीं विश्वाहीं वेगळ । वाढे जैं सूर्यमंडळ ।
तैं तेजमत निखळ । तेंचि होय ॥ ४-१२॥
नाना नीद मारोनी । आपणपें हिरोनी ।
जागणें ठाके होउनी । जागणेंचि ॥ ४-१३॥
तैसें अज्ञान आटोनिया । ज्ञान ये तें उवाया ।
ज्ञानाज्ञान गिळोनिया । ज्ञानचि होय ॥ ४-१४॥
ते वेळीं पुनिवां भरे । ना आवसा सरे ।
तें चंद्रंचि उरे । सतरावी जैशी ॥ ४-१५॥
कां तेजांतरे नाटोपे । कोणे तमें न शिंपे ।
तें उपमेचें जाउपे । सूर्यचि होय ॥ ४-१६॥
म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे ।
तैसें नव्हे निर्वाळें । ज्ञानमात्र जे ॥ ४-१७॥
परी ज्ञानमात्रें निखळें । तेंचि कीं तया कळें ।
काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवीं ? ॥ ४-१८॥
आकाश आपणपया रिघे ? । कायी आगी आपणया लागे ? ।
आपला माथा वळघें । आपण कोण्ही ? ॥ ४-१९॥
दिठी आपणया देखे ? । स्वादु आपणया चाखे ? ।
नादु आपलें आइकें ? । नादपण ॥ ४-२०॥
सूर्य सूर्यासि विवळे ? । कां फळ आपणया फळे ? ।
परिमळु परिमळें । घेपत असे ? ॥ ४-२१॥
तैसें आपणयां आपण । जाणतें नव्हे जाण ।
म्हणोनी ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जें ॥ ४-२२॥
आणि ज्ञान ऐशीं सोये । ज्ञानपणेंचि जरी साहे ।
तरी अज्ञान हें नोहे ? । ज्ञानपणेंचि ॥ ४-२३॥
जैसें तेज जें आहे । तें अंधारें कीर नोहे ।
मा तेज तरी होये । तेजासी काई ? ॥ ४-२४॥

तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें ।
आतां मिथ्या ऐसें येणें । बोलें गमे ॥ ४-२५ ॥
तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था ।
तरी नाहीं हे प्रथा । कवणासी पां ? ॥ ४-२६ ॥
शून्यसिद्धांतबोधु । कोणी सत्ता होय सिद्धु ? ।
नसता हा अपवादु । वस्तूसी जो ॥ ४-२७ ॥
माल्हवितां देवे । माल्हवितें जरी माल्हवे ।
तरी दीपु नाहीं हें फावे । कवणासी पा ॥ ४-२८ ॥
कीं निदेचेनि आलेपणें । निदेलें तें जाय प्राणें ।
तरी नीद भली हें कोणें । कोणासी पा ? ॥ ४-२९ ॥
घटु घटपणें भासे । तद्भंगें भंगु आभासे ।
सर्वथा नाहीं तैं नसे । कोणें म्हणावें ? ॥ ४-३० ॥
म्हणोनि कांहीं नाहींपण । देखता नाहीं आपण ।
नोहोनी असणेनवीण । असणें जें ॥ ४-३१ ॥
परी आणिका कां आपणया । न पुरे विखो होआवया ।
म्हणोनी न असावया । कारण कीं ॥ ४-३२ ॥
जो निरंजनीं निदेला । तो आणिकीं नाहीं देखिला ।
आपुलाही निमाला । आठवु तया ॥ ४-३३ ।
परी जीवें नाहीं नोहे । तैसें शुद्ध असणें आहे ।
हें बोलणें न साहे । असेनाहींचें ॥ ४-३४ ॥
दिठी आपणया मुरडे । तैं दिठीपणही मोडे ।
परी नाहीं नोहे हें फुडे । जाणेचि ते ॥ ४-३५ ॥
कां काळा राहे काळवखा । तो आपणा ना आणिकां ।
न चोजवे तर्क्ष्हीं आसिका । हा मी बाणे ॥ ४-३६ ॥
तैसे असणें कां नसणें । हें कांहींच मानूसवाणें ।
नसोनि असणें । ठायें ठावो ॥ ४-३७ ॥
निर्मळपणीं आपुला । आकाशाचा संचु विराला ।
तो स्वयें असे पुढिला । कांहीं ना कीं ॥ ४-३८ ॥
कां आंगीं कीं निर्मळपणीं । हारतलिया पोखरणी ।
हें आणिका वांचूनि पाणी । सगळेंचि आहे ॥ ४-३९ ॥
आपणा भागु तैसें । असणेंचि जें असे ।
आहे नाहीं ऐसें । सांडूनियां ॥ ४-४० ॥
निदेचें नाहींपण । निमालियाही जागेंपण ।
असिजे कां नेण । कोणी न होऊनि जैसें ॥ ४-४१ ॥
कां भूमी कुंभ ठेविजे । तैं सकुंभता आपजे ।
तो नेलिया म्हणिजे । तेणेंवीण ॥ ४-४२ ॥

परी दोन्ही हे भाग । न शिवति भूमीचें आंग ।
ते वेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥ ४-४३॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे ज्ञान अभेदकथननाम चतुर्थ प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण पांचवे
## सच्चिदानंदपदत्रयविवरण

सत्ता प्रकाश सुख । या तिहीं तीहीं उणे लेख ।
जैसें विखपणेंचि विख । विखा नाहीं ॥ ५-१॥
कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक ।
द्राव गोडी पीयुख । पीयुखचि जेवीं ॥ ५-२॥
उजाळ दृति मार्दव । या तिहीं तिहीं उणीव ।
हें देखिजे सावेव । कापुरीं एकीं ॥ ५-३॥
आंगें कीर उजाळ । कीं उजाळताचि मवाळ ।
कीं दोन्ही ना परिमळ । मात्र जें ॥ ५-४॥
ऐसें एके कापूरपणीं । तिन्ही इये तिहीं उणी ।
इयापरी आटणी । सत्तादिकांची ॥ ५-५॥
येक्ष्र्हवीं सच्चिदानंदभेदें । चालिलीं तिन्ही पदें ।
परि तिन्हीं उणीं आनंदें । केलीं येणें ॥ ५-६॥
सत्ताचि कीं सुखप्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासु ।
हें न निवडे मिठांशु । अमृतीं जेवीं ॥ ५-७॥
शुक्लपक्षीच्या सोळा । दिवसा वाढती कळा ।
परि चंद्र मात्र सगळा । चंद्रीं जेवीं ॥ ५-८॥
थेंबीं पडतां उदक । थेंबां धरूं ये लेख ।
परी पडिलाठायीं उदक । वांचूनि आहे ? ॥ ५-९॥
तैसें असताचिया व्यावृत्ती । सत् म्हणों आलें श्रुति ।
जडाचिया समाप्ती । चिद्रूप ऐसें ॥ ५-१०॥
दुःखाचेनि सर्वनाशें । उरलें तें सुख ऐसें ।
निगदिलें निश्वासें । प्रभूचेनि ॥ ५-११॥
ऐसीं सदादि प्रतियोगियें । असदादि तिन्ही इयें ।
लोटितां जाली त्राये । सत्तादिकां ॥ ५-१२॥
एवं सच्चिदानंदु । आत्मा हा ऐसा शब्दु ।
अनव्यावृत्ति सिद्धु । वाचक नव्हे ॥ ५-१३॥
सूर्याचेनि प्रकाशें । जें कांहीं जड आभासें ।
तेणें तो गिवसें । सूर्यु काई ? ॥ ५-१४॥
तेवीं जेणें तेजें । वाचेसि वाच्य सुजें ।
ते वाचा प्रकाशिजे । हें कें आहे ? ॥ ५-१५॥

विषो नाहीं कोणाही । जया प्रमेयत्वचि नाहीं ।
तया स्वप्रकाशा काई । प्रमाण होये ॥ ५-१६ ॥
प्रमेयपरिच्छेदें । प्रमाणत्व नांदे ।
तें काई स्वतःसिद्धें । वस्तूच्या ठायीं ? ॥ ५-१७ ॥
एवं वस्तूसि जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्त्वता ।
मग जाणणें आणि जाणता । कैचें उरे ? ॥ १८ ॥
म्हणोनि सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक ।
नव्हती हें शेष । विचाराचें ॥ ५-१९ ॥
ऐसेनि इयें प्रसिद्धें । चालिलीं सच्चिदानंद पदें ।
मग द्रष्ट्या स्वसंवादें । भेटती जेव्हां ॥ ५-२० ॥
ते वेळीं वरषोनि मेघु । समुद्र होऊनि वोघु ।
सरे दाऊनि मागु । राहे जैसा ॥ ५-२१ ॥
फळ विउनी फूल सुके । फळनाशे रसपाकें ।
तोही रस उपखें । तृप्तीदानीं ॥ ५-२२ ॥
कां आहुति अग्नीआंतु । घालूनि वोसरे हातु ।
सुख चेवऊनि गीतु । उगा राहे ॥ ५-२३ ॥
नाना मुखा मुख दाऊनी । आरिसा जाय निघोनि ।
कां निदैलें चेववुनी । चेवितें जैसें ॥ ५-२४ ॥
तैसा सच्चिदानंदा चोखटा । दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा ।
तिन्हीं पदें लागतीं वाटा । मौनाचिया ॥ ५-२५ ॥
जें जें बोलिजे तें तें नव्हे । होय तें तंव न बोलवे ।
साउलीवरी न मववे । मवितें जैसें ॥ ५-२६ ॥
मग आपुलियाकडे । मवितया से पडे ।
तैं लाजलाजों आखुडे । मविते जैसें ॥ ५-२७ ॥
तैसी सत्ताचि स्वभावें । असत्ता तंव नव्हे ।
मा सत्तात्व संभवे । सत्तेसि कायि ? ॥ ५-२८ ॥
आणि अचिदाचेनि नाशें । आलें जें चिन्मात्रदशे ।
आतां चिन्मात्रचि मा कैसें । चिन्मात्रीं ये ॥ ५-२९ ॥
नीद प्रबोधाच्या ठायीं । नसे तैसें जागणेंही ।
तेवीं चिन्मात्रचि मा काई । चिन्मात्रीं ये ? ॥ ५-३० ॥
ऐसें यया सुखपणें । नाहीं दुःख कीर होणें ।
मा सुख हें गणणें । सुखासि काई ? ॥ ५-३१ ॥
म्हणोनी सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें ।
सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥ ५-३२ ॥
आतां द्वंद्वाचें लवंचक । सांडूनि दुणीचे कंचुक ।
सुखामात्रचि एक । स्वयें आथी ॥ ५-३३ ॥

वरी एकपणें गणिजे । तें गणितेनसीं ये दुजें ।
म्हणोनि हें न गणिजे । ऐसें एक ॥ ५-३४ ॥
तैसें सुखा आतोनि निघणें । तें सुखीयें सुखी तेणें ।
हें सुखमात्रचि मा कोणें । अनुभवावें ? ॥ ५-३५ ॥
जैं प्रकृति डंकु अनुकरे । तैं प्रकृति डंकें अवतरे ।
मां डंकूचि तैं भरे । कोण कोणा ? ॥ ५-३६ ॥
तैसें आपुलेनि सुखपणें । जया नाहीं सुखावणें ।
आणि नाहीं हेंही जेणें । नेणिजे सुखें ॥ ५-३७ ॥
आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख ।
तेवीं नसोनी सुखासुख । सुखचि जें ॥ ५-३८ ॥
सर्व सिद्धांताचिया उजरिया । सांडूनिया निदसुरिया ।
आपुलिया हात चोरिया । आपणचि जें ॥ ५-३९ ॥
न लवितां ऊंसु । तैं जैसेनि असे रसु ।
तेथिंचा मीठांशु । तोचि जाणे ॥ ५-४० ॥
कां न सज्जिता विणा । तो नादु जो अबोलपणा ।
तया तेणेंचि जाणा । होआवें लागे ॥ ५-४१ ॥
नाना पुष्पाचिया उदरा । न येतां पुष्पसारा ।
आपणचि भंवरा । होआवें पडे ॥ ५-४२ ॥
नाना न रांधितां रससोये । ते गोडी पां कैसी आहे ।
हें पाहणें तैसें नोहे । आणिका जोगें ॥ ५-४३ ॥
तैसें सुखपणा येवों । लाजें आपुलें सुख पावों ।
तें आणिकां चाखों सुवों । येईल काई ? ॥ ५-४४ ॥
दिहाचिया दुपारीं । चांदू जैसा अंबरीं ।
तें असणें चांदाचिवरी । जाणावें कीं ॥ ५-४५ ॥
रूप नाहीं तैं लावण्य । अंग नुठी तैं तारुण्य ।
क्रिया न फुटे तैं पुण्य । कैसें असे ॥ ५-४६ ॥
जैं मनाचा अंकुर नुपजे । तेथिलेनि मकरध्वजें ।
तोचि हन माजे । तरीच घडे ॥ ५-४७ ॥
कां वाद्यविशेषाची सृष्टी । जैं जन्म नेघे दृष्टी ।
तैं नादु ऐशी गोष्टी । नादाचि जोगी ॥ ५-४८ ॥
नाना काष्ठाचिया विटाळा । वोसरलियाही अनळा ।
लागणें तैं केवळा । अंगासीचि ॥ ५-४९ ॥
दर्पणाचेनि नेमेंस । विणचि मुख प्रेमे ।
आणिती तेचि वर्मे । वर्मती येणें ॥ ५-५० ॥
न पेरितां पीक जोडे । तें मुडाचि आहे रोकडें ।
ऐसिया सोई उघडें । बोलणें हें ॥ ५-५१ ॥

एवं विशेष सामान्य । दोहीं नातळे चैतन्य ।
तें भोगिजे अनन्य । तेणेंसीं सदा ॥ ५-५२॥
आतां यावरी जे बोलणें । तें येणेंचि बोलें शहाणें ।
जें मौनाचेंही निपटणें । पिऊनि गेलें ॥ ५-५३॥
एवं प्रमाणें अप्रमाणस । पण केलें प्रमाण ।
दृष्टांतीं वाइली आण । दिसावयाची ॥ ५-५४॥
आंगाचिया अनुपपत्ति । आटलिया उपपत्ती ।
येथें उठली पांती । लक्षणांची ॥ ५-५५॥
उपाय मागिला पाये । घेऊन जाले वाये ।
प्रतीति सांडिली सोये । प्रत्ययाची ॥ ५-५६॥
येथें निर्धारेंसी विचारु । निमोनि जाला साचारु ।
स्वामीच्या संकटी शूरु । सुभटू जैसा ॥ ५-५७॥
नाना नाशु साधूनि आपुला । बोधु बोधें लाजिन्नला ।
नुसधेपणें थोटावला । अनुभवु जेथे ॥ ५-५८॥
भिंगाचिया चडळा । पदरांचा पुंज वेगळा ।
करितां जैसा निफाळा । आंगाचा होय ॥ ५-५९॥
कां गजबजला उबा । पांघुरणें केळीचा गाभा ।
सांडी तेव्हेळीं उभा । कैचा कीजे ? ॥ ५-६०॥
तैसें अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोही अनुभूतिक ।
तें गेलिया कैचें एक । एकासीचि ॥ ५-६१॥
अनुभवा हा ठावोवरी । आपुलीचि अनवसरी ।
तेथें अक्षरांची हारी । वाईल काई ? ॥ ५-६२॥
कां परेसी पडे मिठी । तेथें नादा सळु नुठी ।
मा वावरिजैल ओंठीं । हें कें आहे ? ॥ ५-६३॥
चेइलियाही पाठीं । चेवणयाच्या गोठी ।
कीं धाला बैसें पाठीं । रंधनाच्या ? ॥ ५-६४॥
उदैजलिया दिवसपती । तैं कीं दिवे सेजे येती ।
वांचुनि पिकलां शेतीं । सुइजताती नांगर काई ? ॥ ५-६५॥
म्हणोनि बंधमोक्षाचें व्याज । नाहीं निमालें काज ।
आतां निरूपणाचें भोज । वोळगे जरी ॥ ५-६६॥
आणि पुढिला कां आपणापें । वस्तु विसराचेनि हातें हारपें ।
मग शब्देंचि घेपे । आठवूनियां ॥ ५-६७॥
येतुलियाही परौतें । चांगावें नाहीं शब्दातें ।
जऱ्ही स्मारकपणें कीर्तीतें । मिरवी हा जगीं ॥ ५-६८॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे सच्चिदानंदपदत्रयविवरणं नाम
पंचम प्रकरणं संपूर्णम्॥

## प्रकरण सहावें

### शब्दखंडण

बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
अमूर्ताचा विशदु । आरिसा नव्हे ? ॥ ६-१॥
पाहतें आरिसा पाहें । तेथें कांहींचि नवल नव्हे ।
परि दर्पणें येणें होये । न पाहतें पाहतें ॥ ६-२॥
वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योत्कारु सूर्य जैसा ।
येणें एके गुणें आकाशा । अंबरत्व ॥ ६-३॥
आपण तंव खपुष्प । परी फळ ते जगद्रूप ।
शब्द मवी तैं अमुप । कोण आहे ? ॥ ६-४॥
विधिनिषेधाचिया वाटा । दाविता हाचि दिवटा ।
बंधमोक्ष कळिकटा । शिष्टु हाचि ॥ ६-५॥
हा अविद्येच्या आंगीं पडे । तैं नाथिलें ऐसें विरूढे ।
न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६-६॥
शुद्धा शिवाच्या शरीरीं । कुमारु हा जिउ भरी ।
जेवीं आंगें पंचाक्षरी । तेवींचि बोलु ॥ ६-७॥
जिउ देहें बांधला । तो बोलें एके सुटला ।
आत्मा बोलें भेटला । आपणपयां ॥ ६-८॥
दिवसातें उगो गेला । तंव रात्रीचा द्रोहो आला ।
म्हणोनि सूर्यो या बोला । उपमा नव्हे ॥ ६-९॥
जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा ह्या हातु धरिती ।
मग शब्देंचि चालती । एकलेनि ॥ ६-१०॥
सहाय आत्मविद्येचें । करावया आपण वेंचे ।
गोमटे काय शब्दाचें । एकैक वानूं ॥ ६-११॥
किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
परी ययाही समंधु । नाहीं येथें ॥ ६-१२॥
आत्मया बोलाचें । कांहींचि उपेगा न वचे ।
स्वसंवेद्या कोणाचें । ओझें आथी ? ॥ ६-१३॥
आठवे कां विसरे । विषो होऊनि अवतरे ।
तरी वस्तूशीं वस्तू दुसरें । असेना कीं ॥ ६-१४॥
आपण आपणयातें । आठवी विसरे केउतें ? ।
काय जीभ जिभेतें । चाखे न चाखे ? ॥ ६-१५॥
जागतेया नीद नाही । मा जागणें घडे काई ? ।
स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपीं तैसीं ॥ ६-१६॥
सूर्यो रात्री पां नेणें । मा दिवो काय जाणें ? ।
तेवीं स्मरणास्मरणे वीण । आपण वस्तु ॥ ६-१७॥

एवं स्मरणास्मरण नाहीं । तरी स्मारकें काज काई ? ।
म्हणौनि इये ठाई । बोलु न सरे ॥ ६-१८॥
आणिक एक शब्दें । काज कीर भलें सिद्धं ।
परि धिवसा न बंधे । विचारू येथें ॥ ६-१९ ॥
कां जे बोलें अविद्या नाशे । मग आत्मेनि आत्मा भासे ।
हें म्हणतखेव पिसें । आलेंचि कीं ॥ ६-२०॥
सूर्यो रात्रि मारील । मा आपणया उदो करील ।
हे कुडे न सरती बोल । साचाच्या गांवीं ॥ ६-२१॥
चेईलें निदे रुसे । ऐसी कें नीद असे ? ।
कीं चेईलें चेवो बैसें । ऐसें चेणें आहे ? ॥ ६-२२॥
म्हणोनि नाशापुरती । अविद्या नाहीं निरुती ।
नाहीं आत्मा आत्मस्थिती । रिगे ऐसा ॥ ६-२३॥
अविद्या तंव स्वरूपें । वांझेचें कीर जाउपें ।
मा तर्कांचें खुरपें । खांडे कोणा ? ॥ ६-२४॥
इंद्रधनुष्या सितें । कवण धनवई न लाविजेतें ।
तें दिसें तैसें होतें । साच जरी ? ॥ ६-२५॥
अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगतृष्णिका ।
तरी मार देतो तर्का । अविद्येसी ॥ ६-२६॥
साहे बोलाची वळघी । ऐसी अविद्या असे जगीं ।
तरी जाळूं ना कां आगी । गंधर्वनगरें ? ॥ ६-२७॥
नातरी दीपाचिये सोये । आंधारु कीर न साहे ।
तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ? ॥ ६-२८॥
नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु ।
तेव्हढाहि उद्वसु । उद्यमु पडे ॥ ६-२९॥
जेथें साउली न पडे । तेथें नाहीं जेणें पाडें ।
मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच की ॥ ६-३०॥
दिसतचि स्वप्न लटिकें । हें जागरीं होय ठाउकें ।
तेंवि अविद्याकाळीं सतुकें । अविद्या नाहीं ॥ ६-३१॥
वोडंबरीचिया लेणिया । घरभरी आतुडलिया ।
नागवें नागविलिया । विशेषु काई ? ॥ ६-३२॥
मनोरथाचें परियळ । आरोगिजतु कां लक्ष वेळ ।
परि उपवासा वेगळ । आनु आथी ? ॥ ६-३३॥
मृगजळ जेथ नुमंडे । तेथ असे पां कोरडें ।
मा उमंडे तेथें जोडे । वोल्हांसु काई ? ॥ ६-३४॥
हें दिसे तैसें असे । तरी चित्रींचेनि पाउसें ।
वोल्हावतु कां मानुसें । आगरा तळीं ॥ ६-३५॥

कालवूनि आंधारें । लिहों येती अक्षरें ।
तरी मसीचिया वोरबारें । कां सिणावें ? ॥ ६-३६ ॥
आकाश काय निळें । न देखतु हे डोळे ? ।
तेवीं अविद्येचि टवाळें । जाणोनि घेई ॥ ६-३७ ॥
अविद्या येणें नांवें । मी विद्यमानचि नव्हे ।
हे अविद्याची स्वभावें । सांगतसे ॥ ६-३८ ॥
आणि इये अनिर्वाच्यपण । तें दुजेंही देवांगण ।
आपुलां अभावीं आपण । साधीतसे ॥ ६-३९ ॥
कांहीच जरी आहे । तरी निर्द्धारु कां न साहे ? ।
वरी घटाभावें भोये । अंकित दिसे ? ॥ ६-४० ॥
अविद्या नाशी आत्मा । ऐसी नव्हे प्रमा ।
सुर्या आंगीं तमा । जयापरी ॥ ६-४१ ॥
हे अविद्या तरी मायावी । परी मायावीपणचि लपवी ।
हे साचा आली अभावी । आपुलां हे ॥ ६-४२ ॥
बहुतापरी ऐसी । अविद्या नाहीं आपैसीं ।
आतां बोलू हात वसी । कवणावरी ॥ ६-४३ ॥
साउलि येतें साबळें । हालया भोय आडळे ।
कीं हालेनि अंतराळें । थोंटावे हातु ॥ ६-४४ ॥
कां मृगजळाचा पानीं । गगनाचा अलिंगनीं ।
नातरी चुंबनीं । प्रतिबिंबाच्या ॥ ६-४५ ॥
उठावला वोथरे तवका । तो सुनाथा पडे असिका ।
अविद्यानाशीं तर्का । तैसें होय ॥ ६-४६ ॥
ऐसी अविद्या नासावी । हें वाहेल जो जीवीं ।
तेणें साली काढावी । आकाशाची ॥ ६-४७ ॥
तेणें शेळी गळां दोहावीं । गुडगाडोळां वास पाहावी ।
वाळवोनि काचरी करावी । सांजवेळेची ॥ ६-४८ ॥
जांभई वांटूनि रसु । तेणें काढावा बहुवसू ।
कालवूनि आळसू । मोदळा पाजावा । ६-४९ ॥
तो पाटा पाणी परतु । पडली साउली उलथु ।
वारयाचे तांथु । वळू सुखें ॥ ६-५० ॥
तो बागुलातें मारू । प्रतिबिंब खोळे भरूं ।
तळहातींचे विंचरू । केस सुखें ॥ ६-५१ ॥
घटाचें नाहींपण फोडू । गगनाची फुलें तोडू ।
सशाचें मोडू । शिंग सुखें ॥ ६-५२ ॥
तो कापुराची मसी करू । रत्नदीपीं काजळ धरू ।
वांझेचें लेंकरूं । परणू सुखें ॥ ६-५३ ॥

तो अंवसेनेचि सुधाकरें । पोसू पाताळींची चकोरें ।
मृगजळींचीं जळचरें । गाळूं सुखें ॥ ६-५४ ॥
अहो हें किती बोलावें । अविद्या रचिली अभावें ।
आतां काई नाशावें । शब्दें येणें ॥ ६-५५ ॥
नाहीं तयाचेनि नाशें । शब्द न ये प्रमाणदशे ।
अंधारीं अंधारा जैसें । नव्हे रूप ॥ ६-५६ ॥
अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया युक्ती ।
जेवी दुपारीं कां वाती । अंगणींचिया ॥ ६-५७ ॥
न पेरितां शेती । जे कीं संवगणिया जाती ।
तयां लाजेपरौति । जोडी आहे ? ॥ ६-५८ ॥
खवणियाच्या आंगा । जेणें केला वळघा ।
तो न करितांचि उगा । घरी होता ॥ ६-५९ ॥
पाणियावरी वरखु । होता कें असे विशेखु ।
अविद्यानाशीं उन्मेखु । फांकावा तैसा ॥ ६-६० ॥
माप मापपणें श्लाघे । जंव आकाश मवूं न रिघे ।
तम पाहतां वाउगें । दीपाचें जन्म ॥ ६-६१ ॥
गगनाची रससोये । जीभ जैं आरोगुं जाये ।
मग रसना हें होये । आडनांव कीं ॥ ६-६२ ॥
नव्हतेनि वल्लभे । अहेवपण कां शोभे ।
खातां केळीचे गाभे । न खातां गेले ॥ ६-६३ ॥
स्थूळ सूक्ष्म कवण येकु । पदार्थ न प्रकाशी अर्कु ।
परी रात्रीविषयीं अप्रयोजकु । जालाचि कीं ॥ ६-६४ ॥
दिठी पाहतां काय न फावे । परी निदेतें तंव न देखवे ।
चेता ते न संभवे । म्हणोनियां ॥ ६-६५ ॥
चकोराचिया उद्यमा । लटिकेपणाची सीमा ।
जरि दिहाचि चंद्रमा । गिंवसूं बैसे ॥ ६-६६ ॥
नुसधियेचि साच्या । मुका होय वाचरुकाचा ।
अंतराळीं पायांचा । पेंधा होय ॥ ६-६७ ॥
तैसीं अविद्येसीं सन्मुखें । सिद्धचि प्रतिषेधकें ।
उठलींचि निरर्थकें । जल्पें होतीं ॥ ६-६८ ॥
अंवसे आला सुधाकरु । न करीच काय अंधकारु ? ।
अविद्यानाशीं विचारु । तैसा होये ॥ ६-६९ ॥
नाना न निफजतेनि अन्नें । जेवणें तेंचि लंघनें ।
निमालेनि नयनें । पाहणाचि अंधु ॥ ६-७० ॥
कैसीनि ही वस्तु नसे । तेथें जै शब्दाचा अर्थ हों बैसे ।
तैं निरर्थकपणें नासे । शब्दहि थिता ॥ ६-७१ ॥

आतां अविद्याचि नाहीं । हें कीर म्हणो काई ।
परी ते नाशितां कांहीं । नुरेची शब्दाचें ॥ ६-७२॥
यालागीं अविद्येचिया मोहरां । उठलियाही विचारा ।
आंगाचाची संसारा । होऊनि ठेला ॥ ६-७३॥
म्हणोनि अविद्येचेनि मरणें । प्रमाणा येईल बोलणें ।
हें अविद्याचि नाहींपणें । नेदी घडों ॥ ६-७४॥
आणि आत्मा हन आत्मया । दाऊनी बोलु महिमेया ।
येईल हें साविया । विरुद्धचि ॥ ६-७५॥
आपणया आपणपेंसी । लागलें लग्न कवणे दिवशीं ।
कीं सूर्य अंग ग्रासी । ऐसें ग्रहण आहे ? ॥ ६-७६॥
गगन आपणया निघे ? । सिंधु आपणा रिघे ? ।
तळहात काय वळघे । आपणपयां ? ॥ ६-७७॥
सूर्य सूर्यासि विवळे ? । फळ आपणया फळें ? ।
परिमळु परिमळें । घेपता ये ? ॥ ६-७८॥
चराचरा पाणी पाजणी । करूं येईल एके क्षणीं ।
परि पाणियासि पाणी । पाजवे कायी ? ॥ ६-७९॥
साठीं तिशा दिवसां । माजीं एखादा होय ऐसा ।
जे सूर्यासीच सूर्य जैसा । डोळा दावी ॥ ६-८०॥
कृतांत जरी कोपेल । तरी त्रैलोक्य हें जाळील ।
वांचूनि आगी लावील । आगीसि काई ? ॥ ६-८१॥
आपणपें आपणया । दर्पणेवीण धात्रेया ।
समोर होआवया । ठाकीं आहे ? ॥ ६-८२॥
दिठी दिठीतें रिघों पाहे ? । रुचि रुचीतें चाखों सुये ? ।
कीं चेतया चेतऊं ये ? । हें नाहींच कीं ॥ ६-८३॥
चंदन चंदनपणा लावी ? । रंगु रंगपणा लावी ।
मोतींपण मोतीं लेववी । ऐसें कैसें ? ॥ ६-८४॥
सोनेंपण सोनें कसी । दीपपण दीप प्रकाशी ।
रसपणा बुडी ते रसीं । तें कें जोडे ? ॥ ६-८५॥
आपुलिये मुकुटीं समर्था । चंद्र बैसविला सर्वथा ।
परि चंद्र चंद्राचिये माथा । वाऊं ये काई ? ॥ ६-८६॥
तैसा आत्मराजु तंव । ज्ञानमात्रचि भरींव ।
आतां ज्ञानें ज्ञानासि खेंव । कैसें दीजे ? ॥ ६-८७॥
आपुलेंनि जाणपणें । आपणयातें जाणों नेणे ।
डोळ्या आपुलें पाहाणें । दुवाड जैसें ॥ ६-८८॥
आरसा आपुलिये । आंगीं आपणा पाहे ।
तरी जाणणें जाणों लाहे । आपणयातें ॥ ६-८९॥

दिगंता पैलीकडेचें । धांवोनि सुरिया खोंचे ।
मा तिये कां तियेचें । आंग फुटे ? ॥ ६-९०॥
रसवृत्तीसी उगाणें । घेऊनि जिव्हाग्र शाहाणें ।
परि कायी कीजे नेणे । आपणपें चाखों ॥ ६-९१॥
तरि जिव्हे काय आपलें । चाखणें हन ठेलें ? ।
तैसे नव्हे संचलें । तेंचि ते कीं ॥ ६-९२॥
तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु ।
आतां काय दे शब्दु । तयाचें तया ॥ ६-९३॥
कोणाही प्रमाणाचेनि हातें । वस्तु घे ना नेघे आपणयातें ।
जो स्वयेंचि आइतें । घेणें ना न घेणें ॥ ६-९४॥
म्हणोनि आत्मा आत्मलाभें । नांदवूनि शब्द शोभे ।
येईल ऐसा न लभे । उमसु घेवों ॥ ६-९५॥
एवं माध्यान्हींची दिवा । तम धाडी ना दिवो दावी ।
तैसी उभयतां पदवी । शब्दा जाली ॥ ६-९६॥
आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तये नासणें ।
आत्मा सिद्धचि मा कोणें । काय साधावें ? ॥ ६-९७॥
ऐसा उभय पक्षीं । बोला न लाहोनि नखी ।
हारपला प्रळयोदकीं । वोघु जैसा ॥ ६-९८॥
आतां बोला भागु कांहीं । असणें जयाच्या ठाई ।
अर्थता तरी नाहीं । निपटूनियां ॥ ६-९९॥
बागुल आला म्हणतें । बोलणें जैसें रितें ।
कां आकाश वोळंबतें । तळहातीं ॥ ६-१००॥
तैसीं निरर्थकें जल्पें । होउनियां सपडपें ।
शोभती जैसें लेपे । रंगावरी ॥ ६-१०१॥
एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ।
साचपणें वनें । चित्रींचीं जैसीं ॥ ६-१०२॥
या शब्दाचा निमाला । महाप्रळयो हो सरला ।
अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥ ६-१०३॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे शब्दखंडनं नाम षष्ठम प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण सातवें
## अज्ञानखंडण

येर्क्ष्हवीं तर्क्ष्हीं अज्ञाना । जैं ज्ञानाची नसे क्षोभणा ।
तैं तरी कानारु । खालींच दडे ॥ ७-१॥
आडसूनि अंधारीं । खद्योत दीप्ती शिरी ।
तैसें लटिकेंवरी । अनादि होय ॥ ७-२॥

जैसी स्वप्ना स्वप्नीं महिमा । तमीं मानु असे तमा ।
तेवीं अज्ञाना गरिमा । अज्ञानींचि ॥ ७-३ ॥
कोल्हेरीचे वारु । न येतीं धारकीं धरूं ।
नये लेणा श्रृंगारूं । वोडंबरीचा ॥ ७-४ ॥
हें जाणणेयाच्या घरीं । खोंचिलेंही आन न करीं ।
काई चांदिणां उठे लहरी । मृगजळाची ? ॥ ७-५ ॥
आणि ज्ञान हें जें म्हणिजे । तें अज्ञानचि पां दुजें ।
येक लपऊनि दाविजे । येक नव्हे ? ॥ ७-६ ॥
असो आतां या प्रस्तावो । आधीं अज्ञानाचा धांडोळा घेवों ।
मग तयाच्या साचीं लाहो । ज्ञानही लटिकें ॥ ७-७ ॥
या अज्ञान ज्ञानातें । आंगींचि आहे जितें ।
तरी जेथें असे तयातें । नेण कां न करी ? ॥ ७-८ ॥
अज्ञाने जेथ असावें । तेणें सर्व नेण होआवें ।
ऐसी जाती स्वभावें । अज्ञानाची ॥ ७-९ ॥
तरी शास्त्रमत ऐसें । जे आत्माचि अज्ञान असे ।
आणि तेणेंचि तो गिंवसे । आश्रो जरी ॥ ७-१० ॥
तरी नुठितां दुजें । जैं अज्ञान आहे बीजें ।
तैं तेंचि आथी हे बुझे । कोण येथें ? ॥ ७-११ ॥
अज्ञान तंव आपणयातें । जडपणें नेणे निरुतें ।
आणि प्रमाण प्रमाणातें । होत आहे ? ॥ ७-१२ ॥
या लागीं जरी अज्ञान । करील आपुलें ज्ञान ।
हें म्हणत खेंवो घेववी मौन । विरोधुचि ॥ ७-१३ ॥
आणि जाणति वस्तु येक । ते येणें अज्ञानें कीजे मूर्ख ।
तैं अज्ञान हे लेख । कवण धरी ? ॥ ७-१४ ॥
अहो आपणयाही पुरता । नेणू न करवे जाणता ।
तयातें अज्ञान म्हणतां । लाजिजे कीं ? ॥ ७-१५ ॥
आभाळें भानु ग्रासे । तैं आभाळ कोणें प्रकाशे ? ।
सुषुप्ती सुषुप्तेया रुसे । तैं तेंचि कोणा ? ॥ ७-१६ ॥
तैसें अज्ञान असे जेथें । तेंचि जरी अज्ञान आतें ।
तरी अज्ञान अज्ञानातें । नेणतां गेलें ॥ ७-१७ ॥
ना तरी अज्ञान एक घडे । हें जयास्तव निवडे ।
तें अज्ञान नव्हे फुडे । कोणे काळीं ॥ ७-१८ ॥
पडळही आथी डोळा । आणि डोळा नव्हे आंधळा ।
तरी आथी या पोकळा । बोलिया कीं ॥ ७-१९ ॥
इंधनाच्या आंगीं । खवळलेन आगी ।
तें न जळे तैं वाउगी । शक्तीच ते ॥ ७-२० ॥

आंधारु कोंडूनि घरीं ।घरा पडसायी न करी ।
तैं आंधार इहीं अक्षरीं ।न म्हणावा कीं ? ॥ ७-२१॥
वोजावों नेदी जागणें ।तये निदेतें नीद कोण म्हणे ।
दिवसा नाणी उणें ।तैं रात्रिचि कैंची ॥ ७-२२॥
तैसें आत्मा अज्ञान असकें ।असतां तो न मुके ।
तैं अज्ञानशब्द लटिलें ।आलेंच कीं ॥ ७-२३॥
येक्ष्र्हवी तरी आत्मया ।माजीं अज्ञान असावया ।
कारण म्हणतां न्याया ।चुकी येईल कीं ॥ ७-२४॥
अज्ञान तममेळणी ।आत्मा प्रकाशाची खाणी ।
आतां दोहीं मिळणी ।येकी कैसी ? ॥ ७-२५॥
स्वप्न आणि जागरु ।आठवु आणि विसरु ।
इयें युग्में येका हारु ।चालती जरी ॥ ७-२६॥
शीता तापा एकवट ।वाहे वस्तीची वाट ।
कां तमें बांधिजे मोट ।सूर्यरश्मींची ॥ ७-२७॥
नाना राती आणि दिवो ।येती येके ठाई राहों ।
तैं आत्मा जिवें जिवो ।अज्ञानाचेनि ॥ ७-२८॥
हें असो मृत्यु आणि जिणें ।इयें शोभती जरी मेहुणे ।
तरी आत्मेनि असणें ।अज्ञानेंसि ॥ ७-२९॥
अहो आत्मेन जे बाधे ।तेंचि आत्मेनशी नांदे ? ।
ऐसीं कायसीं विरुद्धं ।बोलणीं इयें ॥ ७-३०॥
अहो अंधारपणाची पैज ।सांडूनी अंधार तेज ।
जाला तैं सहज ।सूर्यचि निभ्रांत ।७-३१॥
दुलांकुडपण सांडलें ।आणि आगीपण मांडिलें ।
तैं तेंचि आगी जालें ।इंधन कीं ॥ ७-३२॥
का गंगा पावत खेंवो ।आनपणाचा ठावो ।
सांडी तैं गंगा हो ।लाहे पाणी ॥ ७-३३॥
तैसें अज्ञान हें अज्ञान नोहे ।तरी आत्मा असकें असों लाहे ।
येक्ष्र्हवीं अज्ञान होये ।लागलेंचि ॥ ७-३४॥
आत्मेनशीं विरोधी ।म्हणोनि नुरेचि इये संबंधीं ।
वेगळी तरी सिद्धि ।जायेचिना ॥ ७-३५॥
लवणाची मासोळी ।जरी जाली जिव्हाळी ।
तरी जळीं ना जळावेगळी ।न जिये जेवीं ॥ ७-३६॥
जें अज्ञान येथें नसे ।तरीच आत्मा असे ।
म्हणोनि बोलणीं वाइसें ।नायकावीं कीं ॥ ७-३७॥
दोरीं सर्पाभास होये ।तो तेणें दोरें बांधों ये ? ।
ना दवडणें न साहे ।जयापरी ॥ ७-३८॥

नाना पुनिवेचेनि आंधारें । दिहा भेणें रात्रीं महुरें ।
कीं येतांचि सुधाकरें । गिळिजे जेवीं ॥ ७-३९ ॥
तियापरी उभयतां । अज्ञान शब्द गेला वृथा ।
हा तर्कावांचूनि हाता । स्वरूपें नये ॥ ७-४० ॥
तरी अज्ञान स्वरूपें कैसें । काय कार्यानुमेय असे ।
कीं प्रत्यक्षचि दिसे । धांडोळूं आतां ॥ ७-४१ ॥
अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं । कीजे जयाची घेणी ।
ते अज्ञानाची करणी । अज्ञान नव्हे ॥ ७-४२ ॥
जैसी अंकुरेंसी सरळ । वेली दिसे वेल्हाळ ।
तें बीज नव्हे केवळ । बीजकार्य होये ॥ ७-४३ ॥
कां शुभाशुभ रूपें । स्वप्नदृष्टी आरोपें ।
तें नीद नव्हे जाउपें । निदेचें कीं ॥ ७-४४ ॥
नाना चांदु एकु असे । तो व्योमीं दुजा दिसे ।
तें तिमिरकार्य जैसें । तिमिर नव्हे पैं ॥ ७-४५ ॥
तैसें प्रमाता प्रमेय । प्रमाण जें त्रय ।
तें अज्ञानाचें कार्य । अज्ञान नव्हे ॥ ७-४६ ॥
म्हणोनि प्रत्यक्षादिकीं । अज्ञान कार्यविशेखीं ।
नेघे तें असे ये विखीं । आनु नाहीं ॥ ७-४७ ॥
अज्ञान कार्यपणें । घेइजे तें अज्ञान म्हणणे ।
तरी घेताही करणें । तयाचेंची ॥ ७-४८ ॥
स्वप्नीं दिसे तें स्वप्न । मा देखता काय आन ।
तैसें कार्यचि अज्ञान । केवळ जरी ॥ ७-४९ ॥
तरी चाखिला गूळ गूळें । माखिलें काजळ काजळें ।
कां घेपे देपे शुळें । हालया सुळें ॥ ७-५० ॥
तैसें कारण अभिन्नपणें । कार्यही अज्ञान होणें ।
तें अज्ञानचि मा काय कोणें । घेपे देपे ॥ ७-५१ ॥
आतां घेतें घेइजे तें ऐसा । विचारु नये मानसा ।
तरी प्रमाण जाला मासा । मृगजळींचा ना ? ॥ ७-५२ ॥
तंव प्रमाणाचिया मापा । न संपडेचि जे बापा ।
तया आणि खपुष्पा । विशेषु काई ? ॥ ७-५३ ॥
मा हे प्रमाणचि नुरवी । आतां आथी हें कोण प्रस्तावी ।
येणें बोलें ही जाणावी । अज्ञान उखी ॥ ७-५४ ॥
एवं प्रत्यक्ष अनुमान । यया प्रमाणां भाजन ।
नहोनि जालें अज्ञान । अप्रमाण ॥ ७-५५ ॥
ना स्वकार्यातें विये । जें कारणपणा नये ।
मी अज्ञान ऐसें बिहे । मानूं साचें ॥ ७-५६ ॥

आत्मया स्वप्न दाऊं । न शके कीर बहू ।
परी ठायें ठाऊ । निदेजों नेणें ॥ ७-५७॥
हें असो जिये वेळे । आत्मपणेंचि निखळें ।
आत्मा अज्ञानमेळें । असे तेणें ॥ ७-५८॥
जैसें न करितां मंथन । काष्ठीं अवस्थान ।
जैसें कां हुताशन । सामर्थ्यांचें ॥ ७-५९॥
तैसें आत्मा ऐसें नांव । न साहे आत्मयाची बरव ।
तैं कांहीं अज्ञान हांव । बांधतें कां ? ॥ ७-६०॥
काइ दीप जैं न लाविजे । तैंचि काजळी फेडिजे ।
कां नुगवतीया वाळिजे । रुखाची छाया ॥ ६१॥
नाना नुठितां देहदशा । कालवूनि लाविजे चिकसा ।
न घडितां आरिसा । उटिजे काई ॥ ६२॥
कां वोहाच्या दुधीं । सायचि असावी आधीं ।
मग ते फेडूं इये बुद्धी । पवाडु कीजे ॥ ७-६३॥
तैसें आत्मयाच्या ठाई । जैं आत्मेपणा ठावो नाहीं ।
तैं अज्ञान कांहीं । सारिखें कैसें ॥ ७-६४॥
म्हणोनि तेव्हांही अज्ञान नसे । हें जालेंचि असे आपैसें ।
आतां रिकामेंचि काइसें । नाहीं म्हणो ॥ ७-६५॥
ऐसाही आत्मा जेव्हां । जैं नातळे भावाभावा ।
अज्ञान असे तेव्हां । तरी तें ऐसें ॥ ७-६६॥
जैसें घटाचें नाहींपण । फुटोनि होय शतचूर्ण ।
कीं सर्वांपरी मरण । मारवलें कीं ॥ ७-६७॥
नाना निदे नीद आली । कीं मूर्छा मूर्छे गेली ।
कीं आंधारी पडली । अंधकूपीं ॥ ७-६८॥
कां अभाव अवघडला । का केळीचा गाभा मोडला ।
चोखळा आसुडला । आकाशाचा ॥ ७-६९॥
कां निवटलिया सूदलें विख । मुकियाचें बांधलें मुख ।
नाना नुठितां लेख । पुसिलें जैसें ॥ ७-७०॥
तैसें अज्ञान आपुलिये वेळ । भोगी हेचि टवाळ ।
आतां तरी केवळ । वस्तू होऊनि असे ॥ ७-७१ ॥
देखा वांझ कैसी विये ? । विरूढती भाजली बियें ? ।
कीं सूर्य कोण्हा लाहे । अंधारातें ? ॥ ७-७२॥
तैसा चिन्मात्रे चोखडा । भलतैसा अज्ञानाचा झाडा ।
घेतला तरी पवाडा । येईल काई ? ॥ ७-७३॥
जे सायेचिये चाडे । डहुळिजे दुधाचें भांडें ।
ते दिसे कीं विघडे । तैसें हें पां ॥ ७-७४॥

नाना नीद धरावया हातीं । चेऊनी उठिला झडती ।
ते लाभे कीं थिती । नासिली होय ॥ ७-७५ ॥
तेवीं पाहावया अज्ञान ऐसें । हें आंगीं पिसें काइसें ।
न पाहतां आपैसें । न पाहणेंचि कीं ॥ ७-७६ ॥
एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी ।
न पडेचि नगरीं । विचाराचिये ॥ ७-७७ ॥
अहो कोण्हेही वेळे । आत्मा अथवा वेगळें ।
विचाराचे डोळे । देखते कां ? ॥ ७-७८ ॥
ना निर्धाराचें तोंड न माखे । प्रमाण स्वप्नींही नाइके ।
कीं निरुती हन मुके । अनसाईपणा ॥ ७-७९ ॥
इतुलियाही भागु । अज्ञानाचा तरी तो मागु ।
निगे ऐसा बागु । पडतां कां देवा ॥ ७-८० ॥
अंवसेचेनि चंद्रबिंबें । निर्वाळिलिये सभे ।
कां मांडलें जैसे खांबे । शशविषाणाचे ॥ ७-८१ ॥
नाना गगनौलाचिया माळा । वांझेचिया जालिया गळा ।
घापती तो सोहळा । पाविजेत असे ॥ ७-८२ ॥
आणूनि कासवीचें तूप । भरू आकाशाचें माप ।
तरी साचा येती संकल्प । ऐसे ऐसे ॥ ७-८३ ॥
आम्हीं येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान आणावें निरुती ।
तें नाहीं तरी किती । वतवतूं पां ॥ ७-८४ ॥
म्हणोनि अज्ञान अक्षरें । नुमसूं आतां निदसुरें ।
परी आन एक स्फुरे । इयेविषयीं ॥ ७-८५ ॥
आपणया ना आणिकातें । देखोनि होय देखतें ।
वस्तू ऐसिया पुरतें । नव्हेचि आंगें ॥ ७-८६ ॥
तरी ते आपणयापुढें । दृश्य पघळे येव्हढें ।
आपण करी फुडें । द्रष्टेपणें ॥ ७-८७ ॥
जेथ आत्मत्वाचें सांकडे । तेथ उठे हें येव्हढें ।
आणि उठिलें तरी रोकडें । देखत असों ॥ ७-८८ ॥
न दिसे जरी अज्ञान । तरी आहे हें नव्हे आन ।
यया दृश्या अनुमान । प्रमाण जालें ॥ ७-८९ ॥
ना तरी चंद्र एक असे । तो व्योमीं दुणावला दिसे ।
तरी डोळां तिमिर ऐसें । मानूं ये कीं ॥ ७-९० ॥
भूमीवेगळीं झाडें । पाणी घेती कवणीकडे ।
न दिसती आणि अपाडें । साजीं असती ॥ ७-९१ ॥
तरी भरंवसेनि मूळें । पाणी घेती हें न टळें ।
तैसें अज्ञान कळें । दृश्यास्तव ॥ ७-९२ ॥

चेइलेया नीद जाये । निद्रिता तंव ठाउवी नोहे ।
परी स्वप्न दाऊनि आहे । म्हणों ये कीं ॥ ७-९३॥
म्हणोन वस्तूमात्रें चोखें । दृश्य जरी येव्हडें फांके ।
तेव्हां अज्ञान आथी सुखें । म्हणों ये कीं ॥ ७-९४॥
अगा ऐसिया ज्ञानातें । अज्ञान म्हणणें केउतें ।
काय दिवो करी तयातें । अंधारु म्हणिपे ? ॥ ७-९५॥
अगा चंद्रापासूनि उजळ । जेणें राविले वस्तू धवळ ।
तयातें काजळ । म्हणिजेत असे ॥ ७-९६॥
आगीचें काज पाणी । निफजा जरी आणी ।
अज्ञान इया वाहणी । मानूं तरी तें ॥ ७-९७॥
कळीं पूर्ण चंद्रमा । आणून मेळवी आमा ।
तरी ज्ञान हें अज्ञान नामा । पात्र होईजे ॥ ७-९८॥
वोरसोनि लोभें । विष कां अमृतें दुभे ।
ना दुभे तरी लाभे । विषचि म्हणणें ॥ ७-९९॥
तैसा जाणणेयाचा वेव्हारू । जेथें माखला समोरु ।
तेथें आणिजे पुरू । अज्ञानाचा ॥ ७-१००॥
तया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होआवें तें कैसें ? ।
येक्ह्र्हवीं कांहींचि असे । आत्मा काई ? ॥ ७-१०१॥
कांहींच जया न होणें । होय तें स्वतां नेणे ।
तरी शून्याचीं देवांगणें । प्रमाणासी ॥ ७-१०२॥
असे म्हणावया जोगें । नाचरे कीर आंगें ।
परी नाहीं हें न लगे । जोडावेंचि ॥ ७-१०३॥
कोणाचे असणेंनवीण असे । कोणीं न देखतांचि दिसे ।
हें आथी तरी काईसें । हरतलेपण ॥ ७-१०४॥
मिथ्या वादाची कुटी आली । ते निवांतचि साहिली ।
विशेषाही दिधली । पाठी जेणें ॥ ७-१०५॥
जो निमालीही नीद देखे । तो सर्वज्ञ येव्हढें काय चुके ? ।
परी दृश्याचिये न टेके । सोइ जो ॥ ७-१०६॥
वेदु काय काय न बोले । परी नांवचि नाहीं घेतलें ।
ऐसें कांहीं जोडिलें । नाहीं जेणें ॥ ७-१०७॥
सूर्यो कोणा न पाहे ? । परी आत्मा दाविला आहे ? ।
गगनें व्यापिता ठाये । ऐशी वस्तू ॥ ७-१०८॥
देह हाडांची मोळी । मी म्हणोनि पोटाळी ।
तो अहंकारु गाळी । पदार्थु हा ॥ ७-१०९॥
बुद्धि बोद्ध्या सोके । ते येव्हडी वस्तु चुके ।
मना संकल्प निके । याहीहूनी ॥ ७-११०॥

विषयाचिया बरडी । अखंड घासती तोंडीं ।
तियें इंद्रियें गोडी । न घेपती हे ॥ ७-१११॥
परी नाहींपणा सकट । खाऊनी भरलें पोट ।
ते कोणाही सकट । कां फावेल ? ॥ ७-११२॥
जो आपणासी नव्हे विखो । तो कोण लाहे देखो ।
जे वाणी न सके चाखों । आपणापें ॥ ७-११३॥
हें असो नामें रूपें । पुढासूनि अमूपें ।
जेथें आलीच वासिपे । अविद्या हे ॥ ७-११४॥
म्हणोनि आपलेंचि मुख । पाहावयाची भूक ।
न बाणे मा आणिक । कें रिघेल ? ॥ ७-११५॥
नाडिले जें वादीकोडें । आंतुचि बाहेरी सवडे ।
तैसा निर्णो सुसुथा पडे । केला येथें ॥ ७-११६॥
कां मस्तकांत निर्धारिली । जो छाया उडों पाहे आपुली ।
तयाची फाकावली । बुद्धि जैशी ॥ ७-११७॥
तैसें टणकोनी सर्वथा । हे ते ऐसी व्यवस्था ।
करी तो चुके हाता । वस्तूचा जिये ॥ ७-११८॥
आतां सांगिजे तें केउतें । शब्दाचा संसारा नाहीं जेथें ।
दर्शना बीजें तेथे । जाणीव आणी ? ॥ ७-११९॥
जयाचेनि बळें । अचक्षुपण आंधळें ।
फिटोनि वस्तु मिळे । देखणी दशा ॥ ७-१२०॥
आपुलेंचि दृश्यपण । उमसो न लाहे आपण ।
द्रष्टत्वा कीर आण । पडली असतां ॥ ७-१२१॥
कोणा कोण भेटे ? । दिठी कैंची फुटे ? ।
ऐक्या सकट पोटें । आटोनि गेलीं ॥ ७-१२२॥
येव्हढें ही सांकडें । जेणें सारोनि येकीकडे ।
उघडिलीं कवाडें । प्रकाशाचीं ॥ ७-१२३॥
दृश्याचिया सृष्टी । दिठीवरी दिठी ।
उठलिया तळवटीं । चिन्मात्रची ॥ ७-१२४॥
दर्शनरिद्धि बहुवसा । चिच्छेषु मातला ऐसा ।
जे शिळा न पाहे आरिसा । वेद्यरत्नाचा ॥ ७-१२५॥
क्षणक्षणीं नीच नवी । दृश्याची चोख मदवी ।
दिठीकरवीं वेढवी । उदार जे ॥ ७-१२६॥
मागिलीये क्षणीचीं अंगें । पारसी म्हणोनियां वेगें ।
सांडूनि दृष्टि रिघे । नवीया रूपा ॥ ७-१२७॥
तैशीच प्रतिक्षणीं । जाणिवेचीं लेणीं ।
लेऊनि आणी । जाणतेपणा ॥ ७-१२८॥

तया परमात्मपदीचें शेष । ना काहीं तया सुसास ।
आणि होय येव्हढी कास । घातली जेणें ॥ ७-१२९ ॥
सर्वज्ञतेची परी । चिन्मात्राचे तोंडवरी ।
परी तें आन घरीं । जाणिजेना ॥ ७-१३० ॥
एवं ज्ञानाज्ञान मिठी । तेंही फांकतसे दिठी ।
दृश्यपणें ये भेटी । आपणपयां ॥ ७-१३१ ॥
तें दृश्य मोटकें देखें । आपण स्वयें दृष्टत्वें तोखे ।
तेंचि दिठीचेनि मुखें । माजीं दाटे ॥ ७-१३२ ॥
तेव्हां घेणें देणें घटे । परी ऐक्याचें सूत न तुटे ।
जेवीं मुखीं मुख वाटे । दर्पणें केलें । ७-१३३ ॥
आंगें आंगावरी पहुडे । चेइला वेगळा न पडे ।
तया वारुवाचेनि पाडें । घेणें देणें ॥ ७-१३४ ॥
पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणापें वेल्हावे जैसें ।
वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसें । सुखें लाहे ॥ ७-१३५ ॥
गुंफी ज्वाळांचिया माळा । लेइलियाही अनळा ।
भेदाचिया आहाळां । काय पडणें आहे ? ॥ ७-१३६ ॥
किं रश्मीचेनि परिवारें । वेढुनि घेतला थोरें ।
तर्‍हीं सूर्यासि दुसरें । बोलों येईल ॥ ७-१३७ ॥
चांदणियाचा गिंवसु । चांदावरी पडलिया बहुवसु ।
काय केवळपणीं त्रासु । देखिजेल ? ॥ ७-१३८ ॥
दळाचिया सहस्रवरी । फांको आपुलिया परी ।
परी नाहीं दुसरी । भास कमळीं ॥ ७-१३९ ॥
सहस्रवरी बाहिया । आहाती सहस्रार्जुना राया ।
तरी तो काय तिया । एकोत्तरावा ? ॥ ७-१४० ॥
सौकटाचिया वोजा । पसरो कां बहू पुंजा ।
परी ताथुवींण दुजा । भाव आहे ? ॥ ७-१४१ ॥
कोडीवरी शब्दांचा । मेळावा घरीं वाचेचा ।
मीनला तर्‍हीं वाचा । मात्र कीं ते ॥ ७-१४२ ॥
तैसे दृश्याचे डाखळे । नाना दृष्टीचे उमाळे ।
उठती लेखावेगळे । द्रष्टत्वेंचि ॥ ७-१४३ ॥
गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा ।
जाला तरी नुसधा । गूळचि कीं तो ॥ ७-१४४ ॥
तैसें हें दृश्य देखो । कीं बहू होऊनि फांको ।
परी भेदाचा नव्हे विखो । तेचि म्हणोनि ॥ ७-१४५ ॥
तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जरी विश्वा अशेखा । भरला आहे ॥ ७-१४६ ॥

दुबंधा क्षीरोदकीं । वाणें परी अनेकीं ।
दिसती तरी तितुकीं । सुतें आथी ? ॥ ७-१४७॥
पातयाचि मिठी । नुकलितां दिठी ।
अवघियाची सृष्टी । पाविजे जरी ॥ ७-१४८॥
न फुटतां बीजकणिका । माजीं विस्तारे वटु असिका ।
तरी अद्वैतफांका । उपमा आथी ॥ ७-१४९॥
मग मातें म्यां न देखावें । ऐसेंही भरे हावें ।
तरी आंगाचिये विसवे । सेजेवरी ॥ ७-१५०॥
पातयाचि मिठी । पडलिया कीजे दिठी ।
आपुलियेचि पोटीं । रिगोनि असणें ॥ ७-१५१॥
कां नुदेलिया सुधाकरु । आपणपें भरे सागरु ।
ना कूर्मी गिळी विस्तारु । आपेंआप ॥ ७-१५२॥
अवसेचिये दिवशीं । सतराविये अंशीं ।
स्वयें जैसें शशी । रिगणें होय ॥ ७-१५३॥
तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडले जैताचिये कुटे ।
तया नांव वावटे । आपणपेयां ॥ ७-१५४॥
सहजें आवघेंचि आहे । तरी कोणा कोण पाहे ? ।
तें न देखणेंचि आहे । स्वरूप निद्रा ॥ ७-१५५॥
नाना न देखणें नको । म्हणे मीचि मातें देखो ।
तरी आपेंआप विखो । अपैसें असे ॥ ७-१५६॥
जें अनादीच दृश्यपणें । अनादीचि देखणें ।
हें आतां कायी कोणें । रचूं जावें ? ॥ ७-१५७॥
अवकाशेशीं गगना । गतीसीं पवना ।
कीं दीप्तीशीं तपना । संबंधु कीजे ? ॥ ७-१५८॥
विश्वपणें उजिवडे । तरी विश्व देखे पुढें ।
ना तें नाहीं तेव्हढें । नाहींचि देखे ॥ ७-१५९॥
विश्वाचें असे नाहीं । विपायें बुडालियाही ।
तर्व्ही दशा ऐशीही । देखतचि असे ॥ ७-१६०॥
कापुराही आथी चांदिणें । कीं तोचि न माखे तेणें ।
तैसें केवळ देखणें । ठायें ठावो ॥ ७-१६१॥
किंबहुना ऐसें । वस्तु भलतिये दशे ।
देखतचि असे । आपणपयातें ॥ ७-१६२॥
मनोरथांचीं देशांतरें । मनीं प्रकाशूनि नरें ।
मग तेथें आदरें । हिंडे जैसा ॥ ७-१६३॥
कां दाटला डोळा डोळ्यां । डोळाचि तारा होऊनियां ।
स्फुरे चोख म्हणौनियां । विस्मो नाहीं ॥ ७-१६४॥

यालागीं एकें चिद्रूपें । आपणयां आपणपें ।
देखिजे कां आरोपे । काय काज ? ॥ ७-१६५ ॥
किळेचें पांघरुण । आपजवी रत्ना कोण ? ।
कीं सोने ले सोनें पण । जोड जोडूं ? ॥ ७-१६६ ॥
चंदन सौरभ वेढी ? । कीं सुधा आपणया वाढी ? ।
कीं गूळ चाखे गोडी ? । ऐसें आथी हें ? ॥ ७-१६७ ॥
कीं उजाळाचे किळे । कापुरा पुटीं दिधलें ? ।
कीं ताऊनि ऊन केलें । आगीतें काई ? ॥ ७-१६८ ॥
नाना ते लता । आपुले वेली गुंडाळितां ।
घर करी न करितां । जयापरी ॥ ७-१६९ ॥
कां प्रभेचा उभळा । दीप प्रकाशे संचला ।
तैसा चैतन्यें गिंवसिला । चिद्रूप स्फुरे ॥ ७-१७० ॥
ऐसें आपणया आपण । आपुलें निरीक्षण ।
करावें येणेंवीण । करीतुचि असे ॥ ७-१७१ ॥
ऐसें हें देखणें न देखणें । हें आंधारें चांदिणें ।
मा चंद्रासि उणें । स्फुरतें का ? ॥ ७-१७२ ॥
म्हणोनि हें न व्हावे । ऐसेंही करूं पावे ।
तरी तैसाचि स्वभावें । आइता असे ॥ ७-१७३ ॥
द्रष्टा दृश्य ऐसें । अळुमाळु दोनी दिसे ।
तेंही परस्परानुप्रवेशें । कांहीं ना कीं ॥ ७-१७४ ॥
तेथें दृश्य द्रष्टां भरे । । द्रष्टेपण दृश्यीं न सरे ।
मा दोन्ही न होऊनि उरे । दोहींचें साच ॥ ७-१७५ ॥
मग भलतेथ भलतेव्हां । माझारीले दृश्यस्द्रष्ट भावा ।
आटणी करीत खेंवा । येती दोन्ही ॥ ७-१७६ ॥
कापुरीं अग्नीप्रवेशु । कीं अग्नि घातला पोतासु ।
ऐसें नव्हे संसरीसु । वेंचु जाला ॥ ७-१७७ ॥
एका एकु वेंचला । शून्य बिंदु शून्यें पुसिला ।
द्रष्टा दृश्याचा निमाला । तैसें होय ॥ ७-१७८ ॥
किंबहुना आपुलिया । प्रतिबिंबा झोंबिनलिया ।
झोंबीसकट आटोनियां । जाइजे जेवीं ॥ ७-१७९ ॥
तैसें रुसता दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी ।
येती तेथें मिठी । दोहींची पडे ॥ ७-१८० ॥
सिंधु पूर्वापर । न मिळती तंवचि सागर ।
मग एकवट नीर । जैसें होय ॥ ७-१८१ ॥
बहु ये हें त्रिपुटी । सहजें हो तया राहटी ।
प्रतिक्षणीं काय ठी । करीतसे ? ॥ ७-१८२ ॥

दोनी विशेषें गिळी । ना निर्विशिष्टातें उगळी ।
उघडी झांपी येकेंच डोळीं । वस्तुचि हे ॥ ७-१८३॥
पातया पातें मिळे । कीं दृष्टत्वें सैंघ पघळे ।
तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ॥ ७-१८४॥
द्रष्टा दृश्याच्या ग्रासी । मध्यें लेखु विकाशी ।
योगभूमिका ऐसी । आंगीं वाजे ॥ ७-१८५॥
उठिला तरंगु बैसे । पुढें अनुही नुमसे ।
ऐसा ठाई जैसे । पाणी होय ॥ ७-१८६॥
कां नीद सरोनि गेली । जागृती नाहीं चेयिली ।
तेव्हां होय आपुली । जैसी स्थिति ॥ ७-१८७॥
नाना एका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी ।
हे गमे तैशिया दृष्टी । दिठी सूतां ॥ ७-१८८॥
कां मावळो सरला दिवो । रात्रीचा न करी प्रसवो ।
तेणें गगनें हा भावो । वाखाणिला ॥ ७-१८९॥
घेतला श्वासु बुडाला । घापता नाहीं उठिला ।
तैसा दोहींसि सिवतला । नव्हे जो अर्थु ॥ ७-१९०॥
कीं अवघवियांचि करणीं । विषयांची घेणी ।
करितांचि एके क्षणीं । जें कीं आहे ॥ ७-१९१॥
तया सारिखा ठावो । हा निकराचा आत्मभावो ।
येणें कां पाहों । न पाहों लाभे ? ॥ ७-१९२॥
कायी आपुलिये भूमिके । आरिसा आपुलियें निकें ।
पाहों न पाहों शके । हें कें आहे ? ॥ ७-१९३॥
कां समोर पाठिमोरिया । मुखें होऊं ये आरिसिया ।
वांचूनि तयाप्रति तया । होआवें कां ? ॥ ७-१९४॥
सर्वांगें देखणा रवी । परी ऐसें घडे केवीं ।
जे उदो वस्तूचीं चवी । स्वयें घेपे ? ॥ ७-१९५॥
कीं रसु आपणया पिये ? । कीं तोंड लपऊनि ठाये ? ।
हें रसपणें नव्हे । तया जैसें ॥ ७-१९६॥
तैसें पाहणें न पाहणें । पाहणेंपणेंचि हो नेणे ।
आणि दोन्ही हें येणें । स्वयेंचि असिजे ॥ ७-१९७॥
जें पाहणेंचि म्हणौनियां । पाहणें नव्हे आपणयां ।
तैं न पाहणें आपसया । हाचि आहे ॥ ७-१९८॥
आणि न पाहणें मा कैसें । आपणपें पाहों बैसे ? ।
तरी पाहणें हें ऐसें । हाचि पुढती ॥ ७-१९९॥
हीं दोन्ही परस्परें । नांदती एका हारें ।
बांधोनि येरयेरें । नाहीं केलें ॥ ७-२००॥

पाहाणया पाहणें आहे । तरी न पाहणें हेंचि नोहे ।
म्हणौनि याची सोये । नेणती दोन्ही ॥ ७-२०१॥
एवं पाहणें न पाहणें । चोरूनियां असणें ।
ना पाहे तरी कोणें । काय पाहिलें ? ॥ ७-२०२॥
दिसल्यानें दृश्य भासे । म्हणावें ना देखिलें ऐसें ।
तरी दृश्यास्तव दिसे । ऐसें नाहीं ॥ ७-२०३॥
दृश्य कीर दृष्टीसी दिसे । परी साच कीं द्रष्टा असे ।
आतां नाहीं तें कैसें । देखिलें होये ? ॥ ७-२०४॥
मुख दिसो कां दर्पणीं । परी असणें कीं तये मुखपणीं ।
तरी जाली ते वायाणी । प्रतीती कीं ॥ ७-२०५॥
देखतांची आपणयातें । आलिये निदेचेनि हातें ।
तया स्वप्ना ऐसा येथें । निहाळितां ॥ २०६॥
निद्रिस्तु सुखासनीं । वाहिजे अनुवाहणीं ।
तो साच काय तेसणी । दशा पावे ? ॥ ७-२०७॥
कीं सिसेंवीण एकएकें । दाविलीं राज्य करिती रंकें ।
तैशीं तियें सतुकें । आथी काई ? ॥ २०८॥
ते निद्रा जेव्हां नाहीं । तेव्हां जो जैसा जिये ठाई ।
तैसाची स्वप्नी कांहीं । न पविजेचि कीं ॥ ७-२०९॥
तान्हेलिया मृगतृष्णा । न भेटलिया शिणु जेसणा ।
मा भेटलेया कोणा । काय भेटलें ॥ ७-२१०॥
कीं साउलियेचेचि व्याजें । मेळविलें जेणें दुजे ।
तयाचें करणें वांझें । जालें जैसें ॥ ७-२११॥
तैसें दृश्य करूनियां । द्रष्टयातें द्रष्टया ।
दाऊनि धाडिलें वाया । दाविलेपणही ॥ ७-२१२॥
जें दृश्य द्रष्टाचि आहे । मा दावणें कां साहे ? ।
न दाविजे तरी नोहे । तया तो काई ? ॥ ७-२१३॥
आरिसा पां न पाहे । तरी मुखचि वाया जाये ? ।
तेणेंवीण आहे । आपणपें कीं ॥ ७-२१४॥
तैसें आत्मयातें आत्मया । न दाविजे पैं माया ।
तरी आत्मा वावो कीं वायां । तेचि ते कीं ना ? ॥ ७-२१५॥
म्हणोनि आपणापें द्रष्टा । न करितां असें पैठा ।
आतां जालाचि दिठा । कां करावा ॥ ७-२१६॥
नाना मागुतें दाविलें । तरी पुनरुक्त तेंचि जालें ।
येणें ही बोलें गेलें । दावणें वृथा ॥ ७-२१७॥
दोरा सर्पाभासा । साचपणें दोरु कां जैसा ।
द्रष्टा दृश्या तैसा । द्रष्टा साचु ॥ ७-२१८॥

दर्पणें आणि मुखें । मुख दिसे हें न चुके ।
परी मुखीं मुख सतुकें । दर्पणीं नाहीं ॥ ७-२१९ ॥
तैसे द्रष्टा दृश्या दोहों । साच कीं देखता ठावो ।
म्हणौनि दृश्य तें वावो । देखिलें जऱ्ही ॥ ७-२२० ॥
वावो कीर होये । तऱ्हीं दिसत तंव आहे ।
येणें बोलें होये । आथी ऐसें ॥ ७-२२१ ॥
तरी आन आनातें । देखोन होय देखतें ।
तरी मानूं येतें । देखिलें ऐसें ॥ ७-२२२ ॥
येथें देखोनि कां न देखोनी । ऐक्य कां नाना होऊनि ।
परी हा येणें वाचूनि । देखणें असे ? ॥ ७-२२३ ॥
आरिशानें हो कां दाविलें । तऱ्हीं मुखचि मुखें देखिलें ।
तो न दावी तऱ्हीं संचलें । मुखचि मुखीं ॥ ७-२२४ ॥
तैसें दाविलें नाहीं । तरी हाचि ययाच्या ठाई ।
ना दाविला तऱ्हींही । हाचि यया ॥ ७-२२५ ॥
जागृती दाविला । कां निदा हारविला ।
परी जैसा येकला । पुरुष पुरुषीं ॥ ७-२२६ ॥
कां रायातें तूं रावो । ऐसा दाविजे प्रत्ययो ।
तऱ्हीं ठायें ठावो । राजाचि असे ॥ ७-२२७ ॥
ना तरी रायपण राया । नाणिजे कीं प्रत्यया ।
तऱ्हीं कांहीं उणें तयास । माजी असे ? ॥ ७-२२८ ॥
तैसें दावितां न दावितां । हा यया परौता ।
चढे न तुटे आइता । असतचि असे ॥ ७-२२९ ॥
तरी कां निमित्य पिसें । हा यया दाऊं बैसें ।
देखतें नाहीं तैं आरिसे । देखावे कोणें ? ॥ ७-२३० ॥
दीपु दावी तयातें रची । कीं तेणेंची सिद्धी दीपाची ।
तैसी सत्ता निमित्ताची । येणें साच ॥ ७-२३१ ॥
वन्हीतें वन्ही शिखा । प्रकाशी कीर देखा ।
परी वन्ही न होनि लेखा । येईल काई ? ॥ ७-२३२ ॥
आणि निमित्त जें बोलावें । तें येणें दिसोनि दावावें ।
देखिलें तरी स्वभावें । दृश्यही हा ॥ ७-२३३ ॥
म्हणौनि स्वयंप्रकाशा यया । आपणापें देखावया ।
निमित्त हा वांचुनियां । नाहींच मा ॥ ७-२३४ ॥
भलतेन विन्यासें । दिसत तेणेंची दिसे ।
हा वांचूनि नसे । येथें कांहीं ॥ ७-२३५ ॥
लेणें आणि भांगारें । भांगारचि एक स्फुरे ।
कां जे येथें दुसरें । नाहींचि म्हणोनि ॥ ७-२३६ ॥

जळ तरंगीं दोहीं । जळावांचूनि नाहीं ।
म्हणौनि आन कांहीं । नाहीं ना नोहे ॥ ७-२३७॥
हो कां घ्राणानुमेयो । येवो कां हातीं घेवो ।
लाभो कां दिठी पाहों । भलतैसा ॥ ७-२३८॥
परी कापुराच्या ठाई । कापुरावांचूनि नाहीं ।
तैशा रीती भलतेयाही । हाचि यया ॥ ७-२३९॥
आतां दृश्यपणें दिसो । कीं द्रष्टा होऊनि असो ।
परी हा वांचूनि अतिसो । नाहीं येथें ॥ ७-२४०॥
गंगा गंगापणें वाहो । कीं सिंधु होऊनि राहो ।
परी पाणीपणा नवलावो । हें न देखो कीं ॥ ७-२४१॥
थिजावें कीं विघरावें । हें अप्रयोजक आघवें ।
घृतपण नव्हे । अनारिसें ॥ ७-२४२॥
ज्वाळा आणि वन्ही । न लेखिजती दोन्ही ।
वन्हिमात्र म्हणोनि । आन नव्हेचि कीं ॥ ७-२४३॥
तैसें द्रश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा ।
पाहतां एकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ॥ ७-२४४॥
इये स्फूर्तीकडोनी । नाहीं स्फुर्तिमात्र वांचुनि ।
तरी काय देखोनी । देखतु असे ? ॥ ७-२४५॥
पुढें फरकें ना दिसतें । ना मागें डोकावी देखतें ।
पाहतां येणें ययातें । स्फुरद्रूपेंचि ॥ ७-२४६॥
कल्लोळें जळीं घातलें । सोनेंनि सोनें पांघुरलें ।
दिठीचे पाय गुंतले । दिठीसीची ॥ ७-२४७॥
श्रुतीसीं मेळविली श्रुती । दृतीसि मेळविली दृती ।
कां जे तृप्तीसीचि तृप्ती । वोगरिली ॥ ७-२४८॥
गुळें गुळें परिवाडिला । मेरु सुवर्णें मढिला ।
कां ज्वाळा गुंडाळिला । अनळु जैसा ॥ ७-२४९॥
हें बहु काय बोलिजे । कीं नभ नभाचिया रिगे सेजे ।
मग कोणें निदिजे । जागे तें कोणें ॥ ७-२५०॥
हा येणें पाहिला आइसा । कांहीं न पाहिला जैसा ।
आणि न पाहतांही आपैसा । पाहणेंचि हा ॥ ७-२५१॥
येथें बोलणें न साहे । जाणणें न समाये ।
अनुभव न लाहे । आंगी मिरौ ॥ ७-२५२॥
म्हणोनी ययातें येणें । ये परीचें पाहणें ।
पाहतां कांहीं कोणे । पाहिलें नाहीं ॥ ७-२५३॥
किंबहुना ऐसें । आत्मेनि आत्मा प्रकाशे ।
न चेतुचि चेऊं बैसे । तयासि तो ॥ ७-२५४॥

स्वयें दर्शनाचिया सवा । अवघीयाची जातसे फावां ।
परी निजात्मभावा । न मोडिताही ॥ ७-२५५ ॥
न पाहतां आरिसा असो पाहे । तरी तेंचि पाहणें होये ।
आणि पाहणेन तरी जाये । न पाहणें पाहणें ॥ ७-२५६ ॥
भलतैसा फांके । परी एकपणा न मुके ।
नाना संकोचे तरी असकें । हाचि आथी ॥ ७-२५७ ॥
सूर्याचिया हाता । अंधकारू नये सर्वथा ।
मग प्रकाशाची कथा । आइकता का ? ॥ ७-२५८ ॥
अंधारु कां उजिवडु । हा एकला एकवडु ।
जैसा कां मार्तंडु । भलतेथें ॥ ७-२५९ ॥
तैसा आवडतिये भूमिके । आरूढलीयाही कौतुकें ।
परि ययातें हा न चुके । हाचि ऐसा ॥ ७-२६० ॥
सिंधूची सींव न मोडे । पाणीपणा सळु न पडे ।
जरी मोडुतु कां गाडे । तरंगांची ॥ ७-२६१ ॥
रश्मी सूर्याची आथी । परी बिंबा बहेरी जाती ।
म्हणौनि बोधसंपत्ती । उपमा नोहे ॥ ७-२६२ ॥
आणि पल्हेचा दोडा । न पडतां तढा ।
जग तंव कापडा । न भरेचि कीं ॥ ७-२६३ ॥
सोनयाचा रवा । रवेपणाचा ठेवा ।
आवघेयाचि अवयवा । लेणें नोहे ॥ ७-२६४ ॥
न फेडितां आडवावो । दिगंतौनि दिगंता जावो ।
न ये मा पावों । उपमा काई ? ॥ ७-२६५ ॥
म्हणौनि इये आत्मलीळे । नाहीं आन कांटाळें ।
आतां येयाचिये तुळे । हाचि यया ॥ ७-२६६ ॥
स्वप्रकाशाचा घांसीं । जेवितां बहु वेगेंसी ।
वेंचेना परी कुशीं । वाखही न पडे ॥ ७-२६७ ॥
ऐसा निरुपमा परी । आपुलिये विलासवरी ।
आत्मा राणीव करी । आपुला ठाई ॥ ७-२६८ ॥
तयातें म्हणिपें अज्ञान । तरी न्याया भरलें रान ।
आतां म्हणे तयाचें वचन । उपसावों आम्ही ॥ ७-२६९ ॥
प्रकाशितें अज्ञान । ऐसें म्हणणें हन ।
तरी निधि दावितें अंजन । न म्हणिजे काई ? ॥ ७-२७० ॥
सुवर्णगौर अंबिका । न म्हणिजे कय काळिका ? ।
तैसा आत्मप्रकाशका । अज्ञानवादु ॥ ७-२७१ ॥
येक्ष्र्हवीं शिवोनि पृथ्वीवरी । तत्त्वाच्या वाणेपरी ।
जयाचा रश्मिकरीं । उजाळा येती ॥ ७-२७२ ॥

जेणें ज्ञान सज्ञान होये । दृण्मात्र दृष्टीतें विये ।
प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ॥ ७-२७३॥
तें कोणें निकृष्टें । दाविलें अज्ञानाचेनि बोटें ।
ना तमें सूर्या मोटे । बांधितां निकें ॥ ७-२७४॥
ग्अग् पूर्वी ज्ञानाक्षरी । वसतां अज्ञानाची थोरी ।
शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे कीं ? ॥ ७-२७५॥
लाखेचे मांदुसे । आगीचें ठेवणें कायिसें ? ।
आंतु बाहेरी सरिसें । करूनि घाली ॥ ७-२७६॥
म्हणोनि जग ज्ञानें स्फितें । बोलतां अज्ञानवादातें ।
विखुरली होती आतें । वाचेचिये ॥ ७-२७७॥
अखरीं तंव गोवधु । पुढारां अनृतवादु ।
मा कैसा अज्ञानवादु । कीजे ज्ञानीं ? ॥ ७-२७८॥
आणि अज्ञान म्हणणें । स्फुरत्से अर्थपणें ।
आतां हेंचि ज्ञान कोणे । मानिजे ना ? ॥ ७-२७९॥
असो हें आत्मराजें । आपणापें जेणें तेजें ।
आपणचि देखिजे । बहुये परी ॥ ७-२८०॥
निर्वचितां जें झावळे । तेंचि कीं लाहे डोळे ? ।
डोळ्यापुढें मिळे । तेंचि तया ॥ ७-२८१॥
ऐसें जगज्ञान जें आहे । तें अज्ञान म्हणें मी वियें ।
येणें अनुमानें हों पाहे । आथी ऐसें ॥ ७-२८२॥
तंव अज्ञान त्रिशुद्धी नाहीं । हें जगेंचि ठेविलें ठाई ।
जे धर्म धर्मित्वें केंहीं । ज्ञानाज्ञान असे ? ॥ ७-२८३॥
काजळां मोतीं वियें ? । राखोंडिया दीपु जिये ? ।
तरी ज्ञान धर्मु होये । अज्ञानाचा ॥ ७-२८४॥
चंद्रमा निगती ज्वाळा ? । आकाश आते शिळा ? ।
तरी अज्ञान उजळा । ज्ञानातें वमी ॥ ७-२८५॥
क्षीराब्धीं काळकूट । हे एकीं परीचे विकट ।
परी काळकूटीं चोखट । सुधा कैंची ? ॥ ७-२८६॥
ना ज्ञानी अज्ञान जालें । तें होतांचि अज्ञान गेलें ।
पुढती ज्ञान एकलें । अज्ञान नाहीं ॥ ७-२८७॥
म्हणौनि सूर्य सूर्याचि येवढा । चंद्र चंद्राचि सांगडा ।
ना दिपाचिया पडिपाडा । ऐसा दीपू ॥ ७-२८८॥
प्रकाश तो प्रकाश कीं । यासि न वंचे घेई चुकी ।
म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ॥ ७-२८९॥
विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा ।
श्रुति काय वायसा । ढेंकर देती ॥ ७-२९०॥

यालागीं वस्तुप्रभा । वस्तूचि पावे शोभा ।
जात असे लाभा । वस्तुचिया ॥ ७-२९१॥
वांचून वस्तु यया । आपणपें प्रकाशावया ।
अज्ञान हेतु वांया । अवघेंचि ॥ ७-२९२॥
म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोणे परी न लाहों ।
अज्ञान कीर वावो । पाहों ठेलियाही ॥ ७-२९३॥
परी तमाचा विसुरा । न जोडेचि दिनकरा ।
रात्रीचिया घरा । गेलियाही ॥ ७-२९४॥
कां नीद खोळे भरिता । जागणें ही न ये हाता ।
येकलिया टळटळिता । ठाकिजे जेवीं ॥ ७-२९५॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे अज्ञानखंडन नाम सप्तम प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण आठवें

## ज्ञानखण्डन

तैसें आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे ।
आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हीच केलों ॥ ८-१॥
परी आम्हा आम्ही आहों । तें कैसें पाहो जावों ।
तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ॥ ८-२॥
हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें ।
जे आम्ही न समाये । आम्हांमाजीं ॥ ८-३॥
अहो आत्मपणीं न संठो । स्वसंविति न घसवटो ।
आंगीं लागलिया न फुटों । कैवल्यही ॥ ८-४॥
आमुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी ।
आमुतें देखे दिठी । ते दिठीचि नव्हे ॥ ८-५॥
आमुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो ।
तैं आमुतें न देखों । आम्हीपणा ॥ ८-६॥
प्रगटो लपो न लाहो । येथें नाहीं नवलाहो ।
परी कैसेनिही विपावो । असणेयाचा ॥ ८-७॥
किंबहुना श्रीनिवृत्तीं । ठेविलों असों जया स्थितीं ।
ते काय देऊं हातीं । वाचेचिया ? ॥ ८-८॥
तेथ समोर होआवया । अज्ञानाचा पाडु कासया ।
केउते मेलिया माया । होऊं पाहिजे ॥ ८-९॥
अज्ञानाचा प्रवर्तु । नाहीं जया गांवाआंतु ।
तेथें ज्ञानाची तरी मातु । कोण जाणे ? ॥ ८-१०॥
राती म्हणोनि दिवे । पडती कीं लावावे ।
वांचुनि सूर्यासवें । शिणणें होये ॥ ८-११॥

म्हणोनि अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही ।
आतां निमिषोन्मेषा दोहीं । ठेली वाट ॥ ८-१२॥
येक्ष्र्हवीं तक्ष्र्हीं ज्ञान अज्ञानानें । दोहींचि अभिधानें ।
अर्थाचेनि आनानें । विप्लाविलीं ॥ ८-१३॥
जैसीं दंपत्तें परस्परे । तोडोनि पालटिलीं शिरें ।
तेथें पालटु ना पण सरे । दोहींचें जिणें ॥ ८-१४॥
कां पाठी लाविला होये । तो दीपुचि वायां जाये ।
दिठी आंधारें पाहे । तैं तेंचि वृथा ॥ ८-१५॥
तैसें निपटून जें नेणिजे । तें अज्ञान शब्दें बोलिजे ।
आतां सर्वही जेणें सुजे । तें अज्ञान कैसें ? ॥ ८-१६॥
ऐसें ज्ञान अज्ञानीं आलें । अज्ञान ज्ञानें गेलें ।
ये दोहीं वांझौलें । दोन्ही जाली ॥ ८-१७॥
आणि जाणे तोचि नेणें । नेणे तोचि जाणे ।
आतां कें असेणे जिणें । ज्ञाना अज्ञाना ? ॥ ८-१८॥
एवं ज्ञानाज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अहनी ।
उदैला चिद्गगनीं चिदादित्यु हा ॥ ८-१९॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे ज्ञानखंडन नाम अष्टम प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण नववें
## जीवन्मुक्तदशाकथन

आतां आमोद सुनास जालें । श्रुतीसि श्रवण रिघाले ।
आरिसे उठले । लोचनेंसी ॥ ९-१॥
आपुलेनि समीरपणें । वेल्हावती विंजणें ।
कीं माथेचि चांफेपणें । बहकताती ॥ ९-२॥
जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ।
चकोरचि जैसे । चंद्रमा झाले ॥ ९-३॥
फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीची झाली नर ।
जालें आपुलें शेजार । निद्राळुचि ॥ ९-४॥
दिठीवियाचा रवा । नागरु इया ठेवा ।
घडिला कां कोरिवां । परी जैसा ॥ ९-५॥
चूतांकूर झाले कोकिळ । आंगच झाले मलयानीळ ।
रस झाले सकळ । रसनावंत ॥ ९-६॥
तैसे भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।
हें सरलें अद्वैता । अफुटामाजीं ॥ ९-७॥
सेवंतेपणा बाहेरी । न निगताचि परी ।
पातीं सहस्रवरी । उपलविजे ते ॥ ९-८॥

तैसें नव नवा अनुभवीं । वाजतां वाधावी ।
अक्रियेच्या गांवीं । नेणिजे तें ॥ ९-९ ॥
म्हणोनि विषयांचेनि नांवें । सूनि इंद्रियांचे थवे ।
सैंघ घेती धांवे । समोरही ॥ ९-१० ॥
परी आरिसा शिवे शिवे । तंव दिठीसी दिठी फावे ।
तैसे झाले धांवे । वृत्तीचिया ॥ ९-११ ॥
नाग मुदी कंकण । त्रिलिंगीं भेदली खूण ।
घेतां तरी सुवर्ण । घेईजे कीं ॥ ९-१२ ॥
वेंचूनि आणूं कल्लोळ । म्हणोन घापे करतळ ।
तेथें तरी निखळ । पाणीच फावे ॥ ९-१३ ॥
हातापाशीं स्पर्शु । डोळ्यापाशीं रूपसु ।
जिव्हेपाशीं मिठांशु । कोण्ही एकू ॥ ९-१४ ॥
तऱ्ही परिमळा परौतें । मिरवणें नाहीं कापुरातें ।
तेवीं बहुतांपरी स्फुरतें । तेंचि स्फुरे ॥ ९-१५ ॥
म्हणोनि शब्दादि पदार्थ । श्रोत्रादिकांचे हात ।
घ्यावया जेथ । उजू होती ॥ ९-१६ ॥
तेथे संबंधु होये न होये । तव इंद्रियांचें तें नोहे ।
मग असतचि आहे । संबंधु ना ॥ ९-१७ ॥
जिये पेरीं दिसती उसीं । तिये लाभती कीं रसीं ।
कांति जेवीं शशीं । पुनवेचिया ॥ ९-१८ ॥
पडिलें चांदावरी चांदिणें । समुद्रीं जालें वरषणें ।
विषयां करणें । भेटती तैशीं ॥ ९-१९ ॥
म्हणोन तोंडा आड पडे । तेंहि वाचा वावडे ।
परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥ ९-२० ॥
व्यापाराचे गाडे । मोडतांहि आपाडे ।
अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही ॥ ९-२१ ॥
पसरूनि वृत्तीची वावे । दिठी रूपातें दे खेवें ।
परी साचाचेनि नांवे । कांहींचि न लभे ॥ ९-२२ ॥
तमातें घ्यावया । उचलूनी सहस्र बाहिया ।
शेवटीं रवी इया । हाचि जैसा ॥ ९-२३ ॥
स्वप्नींचिया विलासा । भेटईन या आशा ।
उठिला तंव जैसा । तोचि मा तो ॥ ९-२४ ॥
तैसा उदैलया निर्विषयें । ज्ञानी विषयी हों लाहे ? ।
तंव दोन्ही न होनी होये । काय नेणों ॥ ९-२५ ॥
चंद्र वेचूं गेला चांदिणें । तंव वेंचिलें काय कोणें ।
विऊनि वांझें स्मरणें । होतीं जैसी ॥ ९-२६ ॥

प्रत्याहारादि आंगीं । योगें आंग टेंकिलें योगीं ।
तो जाला इये मार्गी । दिहाचा चांदु ॥ ९-२७॥
येथ प्रवृत्ति बहुडे जिणें । अप्रवृत्तीसी बाधावणें ।
आतां प्रत्यण्मुखपणें । प्रचारु दिसे ॥ ९-२८॥
द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण ।
भेद तंव तंव दुण । अभेदासी ॥ ९-२९॥
कैवल्याचा चढावा । करीत विषयसेवा ।
झाला भृत्य भज्य कालोवा । भक्तीच्या घरीं ॥ ९-३०॥
घरामाजीं पायें । चालतां मार्गूही तोचि होये ।
ना बैसे तर्‍हीं आहे । पावणेंचि ॥ ९-३१॥
तैसें भलतें करितां । येथें पाविजे कांहीं आतां ।
ऐसें नाहीं न करितां । ठाकिजेना ॥ ९-३२॥
आठवू आणि विसरू । तयातेंही घेऊं नेदी पसरु ।
दशेचा वेव्हारु । असाधारणु ॥ ९-३३॥
जाली स्वेच्छाचि विधि । स्वैर जाली समाधी ।
दशे ये मोक्षऋद्धि । बैसों घापे ॥ ९-३४॥
जाला देवोचि भक्तु । ठावोचि जाला पंथु ।
होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हें ॥ ९-३५॥
भलतेउतेनि देवें । भलतेन भक्त होआवें ।
बैसला तेथें राणिवें । अकर्मु हा ॥ ९-३६॥
देवाचिया दाटणी । देऊळा जाली आटणी ।
देशकाळादि वाहाणीं । येईचिना ॥ ९-३७॥
देवीं देवोचि न माये । मा देवी कें अन्वयो आहे ? ।
येथ परिवारु बहुये । अघडता कीं ॥ ९-३८॥
ऐसाहि स्वामीभृत्यसंबंधास्‍ । लागीं उठलीं श्रद्धा ।
तैं देवोचि नुसधा । कामविजे ॥ ९-३९॥
अवघियाचि उपचारा । जपध्यान निर्धारा ।
नाहीं आन संसारा । देवोवांचुनी ॥ ९-४०॥
आतां देवातेंचि देवें । देववरी भजावें ।
अर्पणाचेनि नांवें । भलतिया ॥ ९-४१॥
पाहें पां आघवया । रुखा रुखचि यया ।
परी दुसरा नाहीं तया । विस्तार जेवीं ॥ ९-४२॥
देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा व्यवहारु । कां न व्हावा ? ॥ ९-४३॥
अओ मुगीं मुग जैसें । घेतां न घेतां नवल नसे ।
केलें देवपण तैसें । दोहींपरी ॥ ९-४४॥

अखतांचि देवता । अखतींचि असे न पूजितां ।
मा अखतीं काय आतां । पुजो जावो ॥ ९-४५ ॥
दीप्तीचीं लुगडीं । दीपकळिके तूं वेढी ।
हें न म्हणतां ते उघडी । ठाके काई ? ॥ ९-४६ ॥
कां चंद्रातें चंद्रिका । न म्हणिजे तूं ले कां ।
तर्ह्री तो असिका । तियाचि कीं ना ॥ ९-४७ ॥
आगीपण आगी । असतचि असे आंगीं ।
मा कासयालागीं । देणें न देणें ? ॥ ९-४८ ॥
म्हणोनि भजतां भजावें । मा न भजतां काय नव्हे ? ।
ऐसें नाहीं स्वभावें । श्रीशिवूचि असे ॥ ९-४९ ॥
अतां भक्ति अभक्ति । जालें ताट एकी पांती ।
कर्माकर्माचिया वाती । माल्हावूनियां ॥ ९-५० ॥
म्हणोनि उपनिषदें । दशे येति निंदे ।
निंदाचि विशदें । स्तोत्रें होती ॥ ९-५१ ॥
ना तरी निंदास्तुति । दोन्हीं मौनासाठीं जाती ।
मौनीं मौन आथी । न बोलतां बोली ॥ ९-५२ ॥
घालिता अव्हासव्हा पाय । शिवयात्राचि होत जाय ।
शिवा गेलियाही नोहे । केंही जाणें ॥ ९-५३ ॥
चालणें आणि बैसक । दोन्ही मिळोनि एक ।
नोहे ऐसें कौतुक । इये ठायीं ॥ ९-५४ ॥
येर्ह्रवीं आडोळिलिया डोळा । शिवदर्शनाचा सोहळा ।
भोगिजे भलते वेळां । भलतेणें ॥ ९-५५ ॥
ना समोर दिसे शिवुही । परि देखिलें कांहीं नाहीं ।
देवा भक्ता दोही । एकचि पाडू ॥ ९-५६ ॥
आपणचि चेंडू सुटे । मग आपणया उपटे ।
तेणें उंदळता दाटे । आपणपांचि ॥ ९-५७ ॥
ऐसी जरी चेंडूफळी । देखिजे कां केव्हेळीं ।
तरी बोलिजे हे सरळी । प्रबुद्धाची ॥ ९-५८ ॥
कर्माचा हातु न लगे । ज्ञानाचेंही कांहीं न रिगे ।
ऐसीचि होतसे आंगें । उपास्ति हे ॥ ९-५९ ॥
निफजे ना निमे । आंगें आंग घुमे ।
सुखा सुख उपमे । देववेल इया ॥ ९-६० ॥
कोण्ही एक अकृत्रीम । भक्तीचें हें वर्म ।
योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ॥ ९-६१ ॥
आंगें कीर एक झालें । परी नामरूपाचे मासले ।
होते तेही आटले । हरिहर येथें ॥ ९-६२ ॥

अहो अर्धनारीनटेश्वरें । गिळित गिळित परस्परें ।
ग्रहण जालें एकसरें । सर्वग्रासें ॥ ९-६३॥
वाच्यजात खाऊनी । वाचकत्वहि पिऊनी ।
टाकली निदैजौनी । परा येथें ॥ ९-६४॥
शिवाशिवा ! समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि ।
घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ९-६५॥
चेतचि मा चेवविलें । निदैलेंचि मा निदविलें ।
आम्हीचि आम्हा आणिलें । नवल जी तुझें ॥ ९-६६॥
आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझें ।
हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणोनी ॥ ९-६७॥
कोणाचें कांहीं न घेसी । आपुलेंही तैसेंचि न देसी ।
कोण जाणे भोगिसी । गौरव कैसें ॥ ९-६८॥
गुरुत्वें जेवढा चांगू । तेवढाचि तारूनि लघू ।
गुरु लघु जाणे जो पांगू । तुझा करी ॥ ९-६९॥
शिष्या देतां वाटे । अद्वैताचा समो फुटे ।
तरी काह्या होती भाटें । शास्त्रें तुझीं ॥ ९-७०॥
किंबहुना ये दातारा । मी तूं याचा संसारा ।
वेंचोनि होसी सोयरा । तेणेंचि तोषें ॥ ९-७१॥
॥ इति श्रीमदमृतानुभवे जीवन्मुक्तदशाकथनं नाम नवमं प्रकरणं संपूर्णम्॥

---

## प्रकरण दहावें
## ग्रंथपरिहार

परी गा श्रीनिवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तुया ।
तरी निवांतचि मियां । भोगावें कीं तें ॥ १०-१॥
परी महेशें सूर्याहातीं । दिधली तेजाची सूति ।
तया भासा अंतर्वर्ती । जगचि केलें ॥ १०-२॥
चंद्रासि अमृत घातलें । तें तयाचि काई येतुलें ।
कीइं सिंधु मेघा दिधले । मेघाचि भागू ॥ १०-३॥
दिवा जो उजेडू । तो घराचाची सुरवाडू ।
गगनीं आथी पवाडु । तो जगाचाची कीं ॥ १०-४॥
अगाधें ही उचंबळती । ते चंद्रीची ना शक्ती ? ।
वसंतु करी तैं होती । झाडांचें दानीं ॥ १०-५॥
म्हणोनि हें असंवर्य । दैविकीचें औदार्य ।
वांचोनि स्वातंतर्य । माझें नाहीं ॥ १०-६॥
आणि हा येवढा ऐसा । परिहारु देऊं कायसा ।
प्रभुप्रभावविन्यासा । आड ठावूनी ॥ १०-७॥

आम्ही बोलिलों जें कांहीं । तें प्रगटची असे ठाई ।
मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावें बोलें ? ॥ १०-८ ॥
नाना विपायें आम्हीं हन । कीजे तें पां मौन ।
तरी काय जनीं जन । दिसते ना ? ॥ १०-९ ॥
जनातें जनीं देखतां । द्रष्टेंचि दृश्य तत्वतां ।
कोण्ही नहोनि आइता । सिद्धांतचि हा ॥ १०-१० ॥
यया परौतें कांहीं । संविद्रहस्य नाहीं ।
आणि हें तया आधींही । असतचि असे ॥ १०-११ ॥
तर्ह्री ग्रंथप्रस्तावो । न घडे हें म्हणों पावो ।
तऱ्ही सिद्धानुवाद लाहों । आवडी करूं ॥ १०-१२ ॥
पढियंतें सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रुची ।
म्हणोनि हा उचितुचि । अनुवाद सिद्ध ॥ १०-१३ ॥
या कारणें मियां । गौप्य दाविलें बोलोनियां ।
ऐसें नाहीं आपसया । प्रकाशूचि ॥ १०-१४ ॥
आणि पूर्णअहंता वेठलों । सैंघ आम्हीच दाटलों ।
मा लोपलों ना प्रगटलों । कोण्ही होऊनी । १०-१५ ॥
आपणया आपणपें । निरूपण काय वोपे ? ।
मा उगेपणे हरपे । ऐसे आहे ? ॥ १०-१६ ॥
म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेंही मौन करी ।
हे पाणियावरी मकरी । रेखिलीयां ॥ १०-१७ ॥
एवं दशोपनिषदें । पुढारी न ढळती पदें ।
देखोनि बुडी बोधें । येथेंचि दिधली ॥ १०-१८ ॥
ज्ञानदेव म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत ।
सेंवूनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥ १०-१९ ॥
मुक्ति कीर वेल्हाळ । अनुभवामृत निखळ ।
परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ॥ १०-२० ॥
नित्य चांदु होये । परी पुनवे आनु आहे ।
हें कां मी म्हणों लाहें । सूर्यदृष्टी ? ॥ १०-२१ ॥
प्रिया सावायिली होये । तै आंगींचे आंगीं न समाये ।
येर्ह्रवीं तेथेंचि आहे । तारुण्य कीं ॥ १०-२२ ॥
वसंताचा आला । फळीं फुलीं आपला ।
गगनाचिया डाळा । पेलती झाडें ॥ १०-२३ ॥
ययालागीं हें बोलणें । अनुभामृतपणें ।
स्वानुभूति परगुणें । वोगरिलें ॥ १०-२४ ॥
आणि मुक्त मुमुक्षु बद्ध । हें तंववरी योग्यता भेद ।
अनुभवामृतस्वाद । विरुद्ध जंव ॥ १०-२५ ॥

गंगावगहना आली । पाणीयें गंगा झालीं ।
कां तिमिरें भेटलीं । सूर्या जैशीं ॥ १०-२६ ॥
नाहीं परिसाची कसवटी । तंववरीच वानियाच्या गोठी ।
मग पंधराविियाच्या पटीं । बैसावें कीं ॥ १०-२७ ॥
तैसें जें या अक्षरा । भेटती गाभारां ।
ते वोघ जैसे सागरा । आंतु आले ॥ १०-२८ ॥
जैशा अकारादि अक्षरा । भेटती पन्नासही मात्रा ।
तैसें या चराचरा । दुसरें नाहीं ॥ १०-२९ ॥
तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी ।
किंबहुना सरोभरीं । श्रीशिवेंशीचि ॥ १०-३० ॥
म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ।
सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ॥ १०-३१ ॥
॥ इति अनुभवामृते ग्रंथपरिहारकथनं नाम दशमं प्रकरणं संपूर्णम् ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide
vishwas underscore bhide at yahoo.com

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 3, 2010
http://sanskritdocuments.org